CMYK

# विकसनशील सोलापूर

सोलापूर तरुण भारत

रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५

वर्धापनदिन विशेष















# उजनीत साकारतोय विकासाचा सेतू

## करमाळा तालुक्यातील पर्यटन स्थळ विकसित होणार

**उजनी जलाशयामध्ये करमाळा तालुक्यातील कुगाव ते इंदापूर तालुक्यातील शिरसोडी या दरम्यान पुल उभारणीचे काम वेगात सुरू झाले आहे. या पुलामुळे पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्याला जवळच्या मार्गाने जोडला जात आहे. शिवाय या पुलामुळे उजनी धरण परिसरातील गावे पर्यटन स्थळ म्हणून विकसित होणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा व पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्याच्या सीमेवर उजनी धरणाचा पाणलोट परिसर आहे. करमाळा तालुक्यातील कुगाव, चिकलठाण ते इंदापूर तालुक्यातील कळाशी, कालठाण नं.२ पडस्थळ अशी जलमार्गे जीवघेणी प्रवासी वाहतूक बेकायदेशीरपणे बोटीद्वारा सुरू आहे. त्यामुळे उजनी धरण पाणलोट परिसरात पुल उभारण्याची वारंवार मागणी होत होती. अखेर पुलाच्या कामासाठी ३९६ कोटी रुपये मंजूर होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण करून ऑगस्ट २०२४ मध्ये या पुलाच्या कामाचे भूमिपूजन झाले व सध्या या पुलाचे काम वेगात सुरू झाले आहे. यामध्ये केबल सपोर्ट फुलाचे बांधकाम, पोस्ट मार्गाचे बांधकाम वेगात केले जात आहे.**

### पुलाचे फायदे....

पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्याला जोडला जाणार असून करमाळा तालुक्यातील तरकारी मालाला पुणे, मुंबई येथील बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. उसासाठी पुणे जिल्ह्यातील पर्यायी साखर कारखाने उपलब्ध होणार असून केळी निर्यातीस बंदरावर जाण्यासाठी मार्ग उपलब्ध होणार आहे तर उजनी पाणलोट क्षेत्रातील टुरिझम ट्रँगल परिसरातील पर्यटनाचा विकास व चालला मिळणार आहे. याशिवाय उजनी पाणलोट परिसरातील बोटिंग व्यवसायाला चालना मिळणार असून उजनी पानलोट क्षेत्रातील मासेमारांना मोठया शहरातील बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

### असे होणार पुलाचे काम....

करमाळा तालुक्यातील कुगाव ते इंदापूर तालुक्यातील शिरसोडी दरम्यान उजनी पाणलोट पात्रात १३२० मीटर लांबीचा पूल होणार आहे. कु गावच्या बाजूला ४२० मीटर व शिरसोडी गावच्या बाजूला २५० मीटरचा भराव आहे. राज्य शासनाने ३९४ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली असून २८४ कोटी ५३ लाखाची ही निविदा काढली होती. मे टी अँड टी. पुणे या कंपनीला ३६० कोटी रुपयांचा ठेका मिळाला असून ९०० दिवसात काम पूर्ण करण्याची अट टाकण्यात आली आहे. त्यानुसार पुलाचे काम वेगात युद्धपातळीवर सुरू झाले आहे.

### ८० किलोमीटर प्रवास वाचणार..

मराठवाड्याला जोडून असलेल्या करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील कुगाव, चिकलठाण, केडगाव, शेटफळ यासह वाड्या वस्त्यावरील ग्रामस्थांना पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील इंदापूर व भिगवण येथे जाण्यासाठी रस्त्याच्या मार्गाने टेंभुर्णीहून वळसा घालून तब्बल ८० किलोमीटरचा प्रवास करावा लागत असे किंवा पाणलोट क्षेत्रातून जीव धोक्यात घालून तोच प्रवास होडीतून जलमार्गे करावा लागत असे. आतापर्यंत या जलप्रवासातील दुर्घटनेत चाळीसहून अधिक प्रवाशांना जलसमाधी मिळाली आहे. यासाठी उजनी जलाशयात जोड पुलाची मागणी गेल्या अनेक वर्षापासून होत होती. विधानसभा निवडणुकीपूर्वी या कामाचे भूमिपूजन झाले होते व आता या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झालेली असल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.



**नंदकिशोर वलटे**
उमरड, करमाळा
९९२१४२६०४८



या पुलामुळे ८० किलोमीटरचा प्रवास वाचणार असून अवघ्या चार किलोमीटर अंतरानंतर पुणे जिल्ह्यात इंदापुर तालुक्यात मध्ये प्रवेश मिळणार आहे. तिन्ही बाजूंनी तीस किलोमीटर पाण्याने वेढलेल्या कुगाव सह परिसरातील चिखलठाण, दहिगाव, शेटफळ, पोफळज, केडगाव, पूर्वसोगाव , बिटरगाव आदी गावासह इंदापूर तालुक्यातील गावांचा दळणवळणाचा प्रश्न बिकट होता धोकादायक जल मार्गानेच प्रवासी वाहतूक करावी लागत होती. विधानसभा निवडणूकी पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पुलाच्या कामाला मंजुरी देऊन २३ ऑगस्ट रोजी भूमिपूजन केले होते. या पुलाचे प्रत्यक्ष काम सध्या वेगाने चालू झाले आहे.

कुगाव ते शिरसोडी पुलामुळे करमाळा व इंदापूर तालुक्याच्या अर्थकारण व पर्यटनाला चालना मिळेल. सध्या उजनी जलाशयातून होत असलेल्या धोकादायक जलवाहतुकीतूनही सुटका होऊन वेळ व पैसा वाचणार आहे त्याशिवाय उजनी पाणलोट क्षेत्रात येणाऱ्या ३५० हून अधिक प्रकारच्या पक्षाचे निरीक्षण करण्यासाठी पक्षी निरीक्षण केंद्र व पर्यटन आदी बाबीवर लक्ष केंद्रित होणार आहे

### ब्रिटिश कालीन डिक्सळ पुलाला मिळाला ५५ कोटी ५५ कोटीचा निधी

करमाळा तालुक्याच्या पश्चिम भागातील अत्यंत म हत्त्वाचे असलेल्या डिकसळ पुलाला ५५ कोटी रुपयांचा निधी गतवर्षी मंजूर झालेला आहे डिकसळ फुलासाठी मंजूर झालेल्या ५५ कोटी निधी मधून जिल्हा हद्दते कोंढार चिंचोली खादगाव ते कोमलवाडी ला जोडणारा रस्ता १९० किलोमीटर मध्ये मोठा पूल बांधण्यात येणार आहे या फुलाला निधी मंजूर झाल्यामुळे तालुक्यातील पश्चिम भागातून पुणे व अहमदनगर जिल्ह्याला जोडण्याचा मार्ग सुकर झाला आहे उजनी जलाशयाचा भौगोलिक विस्तार मोठा आहे करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील गावांना दळणवळण सोयीस्कर व्हावे यासाठी कोंढार चिंचोली जवळील डिकसळ पुलास शासनाकडून मंजुरी मिळूनही काम हे सुरू झाले आहे परंतु हे दोन्ही फुल झाले तरी उजनी जलाशय काठावरील मध्यवर्ती गावांना आरोग्य शिक्षणासाठी इंदापूर बारामती येथे जाण्यासाठी ८० ते ९० किलोमीटर हुन अधिक वळसा घालून जावे लागणार आहे त्यामुळे गोयेगाव ते आजोती दरम्यान पुल हावा अशी मागणी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्वेक्षण करून राज्य शासनाकडे अहवाल पाठवला आहे.

## कुगाव ते इंदापूर जोडपुलाचे फायदे

१) मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील अंतर १०० किलोमीटर कमी होणार
२) मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा सर्वात जवळचा मार्ग तयार होणार
३) इंदापूर शहराची उलाढाल पाच पट वाढणार
४) तरकारी मालाला पुणे मुंबई बाजारपेठ तात्काळ उपलब्ध होणार
५) उसासाठी पुणे जिल्ह्यातील पर्यायी कारखाने उपलब्ध होणार
६) केळी निर्यातीस गछ्झढ चींलरळ बंदरावर जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग उपलब्ध होणार (सध्या देशात सर्वाधिक केळीची निर्यात उजनी बॅकवॉटर परिसरातून होते)
७) रोजगार निर्मितीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढणार
८) उजनी बॅकवॉटर टुरिझम ट्रॅन्गल परिसरातील पर्यटनाचा विकास होणार (भिगवन-टेंभूर्णी-कुंभेज-भिगवन)
९) हनुमान भक्तांची मागणी असणारा मार्ग पूर्ण होऊन हनुमान भक्तांची गैरसोय दूर होणार
१०) रूई येथील बाबीर देवस्थान ला भेट देणाऱ्या बाबीर भक्तांची गैरसोय दूर होणार
११) दर्जेदार शिक्षणाची सोय (इंदापूर, भिगवण, बारामती) होईल
१२) आरोग्याची सोयी सुविधा (इंदापूर, बारामती, पुणे)उपलब्ध होणार
१३) उजनी बॅकवॉटर परिसरात चित्रपटाचे चित्रीकरण होणार
१५) उजनी बॅकवॉटर परिसरातील बोटींग व्यवसायाला प्रचंड चालना मिळणार
१६) उजनी धरणात साधारण ६०,००० कोटी+ ची वाळू आहे त्यासाठी पर्यायी मार्ग तयार होणार
१७) बलुतेदार अन् अलुतेदार यांच्या पारंपारिक व्यवसायाला प्रचंड चालना मिळणार
१८) मराठवाड्यातील व्हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढेल
१९) रोटी बेटी चे संबंध वाढणार
२०) मासेमारी बांधवांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार
२१) आपल्या परिसरातील जमीनीच्या किंमती प्रचंड वाढणार
२२) वाहतुकीची सोय उपलब्ध झाल्याने आपल्या परिसरात मोठ मोठे उद्योग धंदे वाढण्यास मदत मिळणार
२३) आपल्या परिसरात मुबलक पाणी साठा असल्याने आपल्या भागात मोठ्या प्रमाणात घरे वाढणार
२४) शहरी भाग व ग्रामीण भाग अंतर कमी होण्यास मदत होणार
२५) फोटोग्राफी व्यवसायाला पर्यटकांमुळे चांगल्या पद्धतीने व्यवसाय वाढवण्याची संधी उपलब्ध होणार
२६) व्यवसाय वाढल्याने जाहिरात क्षेत्रात काम करणार्या लोकांना चांगल्या संधी उपलब्ध होणार
२७) स्थानिक परिसरातील बेरोजगार युवकांना गावातच रोजगार निर्माण होणार
२८) पश्चिम महाराष्ट्राला जोडल्याने मराठवाड्याच्या विकासाचा वेग प्रचंड वाढणार



# ज्यांची बाग फुलून आली त्यांनी दोन फुले दिली

**आज दत्ता हलसगीकर (दादा )यांच्या 'उंची' या कवितेतील त्या ओळी आठवल्या-**

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत

**खरचं ,त्यांच्या बागा फुलून आल्या होत्या आणि मी फुलांच्या शोधात होतो. या दोनओळीने मला ३२ वर्ष मागे नेले. पाटबंधारे खात्यात घोडनदी (शिरूर) येथे मी काम करीत होतो. पुणे शहरात प्रत्येक आठवड्याला जाऊन कविता ऐकत ऐकतच कवितेला चांगलाच नादावलो, तेव्हाच माझ्या मनात कवितेने ठान मांडून कविता बसली. थोडं लिहू लागलो, कुठेतरी वाचून दाखवू लागलो, ठिकाण शोधून काढलं, जिथे कविता वाचता येत होत्या आणि अनेकांच्या ऐकता येत होत्या. ती संस्था 'काव्यशिल्प ', पुणे. तिथं आठवड्याला जाऊ लागलो. कवी संमेलनासाठी एक ग्रुप तयार झाला. कवी संमेलनाला जाऊ लागलो. १९९२ ला विजयानंद संस्थेने काव्य लेखन स्पर्धा घेतली, त्यात मला प्रथम क्रमांक मिळाला. पुण्यात स्थायिक होण्याची स्वप्न गडद होत चालली होती, एवढ्यात मला पदोन्नतीचा निरोप आला. पुणे जिल्ह्यात नारायणगावला तुम्हाला पोस्टिंग दिले तर चालेल का? मी चौकशी करून सांगतो, असे सांगितले.माझी दोन मुले सेमी इंग्लिश मीडियमला होती, तिथे सोय नव्हती,शोध चालू केला तेव्हा सोलापूरला पोस्टिंग ही मिळू शकत होते आणि मुलांच्यासाठी हरिबाई देवकरण मध्ये त्यांची सोय होत होती. घोड नदीचा पसारा आवरला, सोलापुरला आलो. ते साल होते १९९३.**

सोलापूरला आल्यानंतर बरोबर एक वर्षांनी माझे काव्य क्षेत्रातले गुरु सुधाकर नेरलेकर पहाट ,पुणे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि आकाशवाणीचे कवी, त्या काळात पुण्यातले प्रसिद्ध कवी. सोलापूरला आले.. चालता पळता कवी पण शरीरात काहीतरी बिघडलं आणि दोन्ही पाय लुळे पडले, खुरडत चालण्याची अवस्था निर्माण झाली. अशा अवस्थेत त्यांनी पुणे सोडले आणि रोहिणी तडवळकर यांचा आधार असल्याने सोलापूरला आले.

सोलापूरला येताच त्यांनी मला बोलावून घेतले, त्यांची अवस्था पाहून माझ्या डोळ्याच्या कडा ओलावल्या, त्यांनी माझ्या कवितेचा प्रवास विचारला आणि तुमचा आपण काव्यसंग्रह प्रकाशित करूअसे बोलले. माझी अडचण त्यांना सांगितली, माझ्याकडे तर फक्त तीसच कविता, यावर त्यांनी बी कवीचे उदाहरण देऊन मला समजावले. त्यांना मी आर्थिक मदत केली असती तर ,त्यांनी स्वीकारली नसती. त्यांची परिस्थिती माझ्या लक्षात आली होती. विचार केला ,गुरुचं ऋण कमी करण्याची संधी मिळते आणि मी तयार झालो.

माझा पहिला काव्यसंग्रह 'दस्तऐवज' त्यांच्या पहाट, पुणे या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित करण्याची पूर्ण जबाबदारीरी त्यांनी घेतली .पेपरला बातम्या देण्यापासून ते पाहुणे ठरवण्यापर्यंत. शेवटी दिनांक १६ .११. १९९४ रोजी दमानी सभागृह (सध्या टीव्हीएस चे शोरूम) येथे प्रकाशन सोहळासाजरा झाला. या सोहळ्यात प्रम ुख पाहुणे म्हणून पंढरीची वारी या चित्रपटाचे दिग्दर्शक रमाकांत कवठेकर होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये दै.तरुण भारतचे संपादक, विवेक घळसासी, दै. संचारचे रंगां आण्णा वैद्य ,बँक अधिकारी, श्याम भुर्के,डॉ. चंद्रशेखर हिरेमठ, पाटबंधारे खात्याचे अधिकारी, सुरेश सोडल साहेब आणि भालेराव साहेब अशी दिग्गज मंडळी हजर होती .माझ्या आयुष्यातले पहिलेच पुस्तक प्रकाशित होत असल्याने, मी माझे आई-वडिलांनाही गावाकडूनून आणले होते .



**गोविंद काळे**
सोलापूर
८४५९८७४२७८

दस्तऐवज काव्यसंग्रहावर भाष्य करताना दै. तरुण भारतचे संपादक विवेक घळसासी सरांनी वापरलेली ती वाक्ये मी कधीच विसरू शकत नाही. पहिले वाक्य -गोविंद काळे यांचा काव्यसंग्रह म्हणजे ,गोवारी समाजावर नागपूर येथे गोळीबार झाला त्या समाजाचे प्रतिनिधित्व करणाराआहे. तर दुसरं वाक्य म्हणजे संपूर्ण काव्यसंग्रहात गोविंद काळे यांनी कुठेही आदळ आपट केलेली नाही. त्याचे कारण त्यांच्या गळ्यातअसलेली पांडुरंगाची माळ. संचारचे संपादक रंगा अण्णा वैद्य यांनाबोलता येत नसल्याने त्यांनी भाष्य लिहिले होते, ते प्रा. देवेंद्र मदने सरांनी सरांनी वाचून दाखविले. प्रा.डॉ. चंद्रशेखर हिरेम ठ सर,म्हणाले, गोविंद काळे हे प्रामाणिक कवी आहेत ,उतरंडीच्या तळातील गाडग्याची भूमिका त्यांच्या वाट्याला आलेली असली तरी उतरंड ढासळू नये म्हणून काळोख पिऊन चांदण्यात बागडण्याची स्वप्न पाहणारा हा कवी. (काव्यसंग्रहातील उतरंड कविता) खऱ्या अर्थाने यांना कविता सापडली आहे. विवेक घळसासी सरांनी माझ्या आई वडिलांचा सत्कार केला. सर्व वर्तमानपत्रात बातम्या झळकल्या आणि सोलापूरच्या कार्यक्षेत्रात एका नवोदित कवीची भर पडली. थोडक्यात त्या कार्यक्रमाने मला कवी म्हणून माझी ओळख सर्व दूर पोहोचली.

सोलापूरला तशी काव्याची मोठी परंपरा याचीही जाणीव होत गेली, लावलणी लिहिणारे शाहीर राम जोशी म्हणजे काव्य क्षेत्रातला मैलाचा दगड किंवा इंजीनियरिंग मध्ये त्यांना बेंच मार्क म्हणता येईल, कवींच्या बद्दलच्या लेवल घेताना यांच्यापासूनच सुरुवात होते. त्यांनी तमाशाचा फड उभा केला होता. सोलापूरचा आणिसोलापूरच्या काव्यपरंपरेचा त्यांना केवढा अभिमान ,त्यांनी लिहलं माय कुणाची व्याली।गगनाखाली। ऐशी कविताा सोलापूरी.कवी कुंजविहारी यांचा धगधगता अंगार कवितेतून व्यक्त झाला ,भेटेन नऊ महिन्यांनी, या कवितेतून स्वातंत्र्यदेवतेला केलेली विनंती कोण विसरेल? वि.म.कुलकर्णी, यांची कविता अभ्यासक्रमात शिकलो.कवी संजीव यांनी राम जोशी प्रमाणे लावण्या लिहिल्या, त्यांच्या त्या लावण्या आजही टवटवीत आहेत. अत्तराचा फाया तुम्ही मला आणा राया आणि केवड्याचा रंग .भाऊ बहिणीच्या प्रेमाचं त्यांचं गीत, ओवाळीते भाऊराया, वेड्या बहिणीची वेडी म ाया. सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आलो ,क्षणभर उघड नयन देवा, अशी पांडुरंगाला विनवणी करणारे रा.ना. पवार .या काव्यपरंपरेने मला शिकवलं कितीही लिहिलंस तरी पाय जमिनीवर राहू दे.

माझा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यानंतर त्यावेळच्या सोलापुरातील जेष्ठ आणि श्रेष्ठ कवींनी मला त्यांच्यात मिसळून घेतलं, याची मला आजही जाण आहे. कवी संमेलनाचा ग्रुप तयार झाला. त्यामध्ये दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्ली, व्यंकटेश कामतकर ,विजया जहागिरदार, चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, माधव पवार आणि मी. यांच्या बागा फुलून आलेल्या आणि मी फुलांच्या शोधात, खरंच हलसगीकर दादांनी मला ओवी शिकवली, त्यांच्या मऊ हाताच्या स्पर्शाने कविता या देहाचीत्या देही पोचली.लक्ष्म ीनारायण बोल्ली यांनी अभंग शिकवला आणि मी अभंग लिहिण्याचा झपाटा लावला. हा माझा झपाटा हेमकिरण पत्कींच्या लक्षात येताच, त्यांनी अहिल्यादेवींचे चरित्र अभंगातून लिहिण्याचे सुचित केले.आणि मी अहिल्यागाथा ग्रंथ छापला. व्यंकटेश कामतकर म्हणाले , अरे ,धरणावर काम करून धरणावरची एककविता नाही.

धरणावरच्या भरपूर कविता लिहिल्या त्या लोकांना ऐकवल्या, लोकांना आवडल्या. व्यंकटेश कामतकर विनोदाने म्हणत ,अरे धरण कवी आला आहे याला जागा द्या नाहीतर हा धरणे धरून बसेल .कालांतराने 'धरणगणी' हा माझा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. शरण कुमार लिंबाळे यांना हा काव्यसंग्रह देताना ते म्हणाले अरे हा कादंबरीचा विषय, कादंबरी लिहा, तसेच डॉ.विश्वनाथ शिंदे सरांनी तर मला आंतरदेशीय पत्राने कळविले कादंबरी लिहा. दहा वर्षानंतर मी 'हिडन मेजरमेंट' नावाची कादंबरी लिहिली. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांच्या आत्म्ये घ्या आत्म्याने माझ्या हृदयात स्थान मिळविले पण त्यांची कविता देवांना आवडली असावी, त्यांचा कमी वयातच स्वर्गवास झाला. माधव पवार नावाच्या रांगड्या कवीने श्रद्धा नावाच्या कवितेतून सांगितलं, श्रद्धेला तडा गेला की, प्रत्यक्ष परमेश्वर ही दगड वाटू लागतो, तेव्हाकवितेवरची माझी श्रद्धा आणखी वाढली. विजया जहागिरदार यांच्या कर्मयोगी कादंबरीतून मला प्रेरणा मिळाली आणि अहिल्यादेवींच्या वर 'बेल भंडार 'कादंबरी लिहिली.

वडील कुर्डुवाडीला दवाखान्यात होते, त्यांना भेटण्यासाठी गेलो. तिथे डॉ. राजेंद्र दास सरांची भेट झाली ते बोलत बोलत म्हणाले, तू काही करू नकोस तुझे वडील बोलतात ते लिहुन काढ उत्कृष्ट साहित्य निर्माण होईल. वडील गेल्यानंतर त्यांच्यावर 'बापाचा बाप' नावाची कादंबरी लिहिली .शाहीर अमर शेख सोलापूर जिल्ह्यातील बार्शीचे, त्यांनी यशवंतराव होळकर यांच्यावर लिहिलेला पोवाडा वाचला. रक्त सळसळलं आणि त्यांच्यावर 'महायोद्धा',महाराजा यशवंतराव होळकर नावाची कादंबरी लिहिली. खरंच इथल्या साहित्यिकांच्या बागात फुलून आल्या होत्या, मी फुलांच्या शोधात. माझ्या हाती त्यांनी फुले दिली.

विंदा करंदीकरांच्या त्या दोन ओळी विसरता येणार नाहीत.

**देणाराने देत जावे**
**घेणारानी घेत जावे**
**घेता घेता एक दिवस**
**देणाऱ्याचे हात घ्यावे**

देणाऱ्याचे हात घेतले ,म्हणजेच वृत्ती घेतली, त्यांचा संदेश घेतलाय. कदाचित त्यामुळे माझा हात लिहिता राहिलाय.




# स्वतंत्र पंढरपूर जिल्हा निर्मिती ही काळाची गरज

**सोलापूर जिल्हा परिषदे मध्ये पंढरपूर जिल्हा निर्मितीचा ३० जुलै २०२१ रोजी ठराव पारित करुन चार ते पाच वर्षाचा काळ लोटला. मात्र पंढरपूर जिल्हा निर्मितीचे स्वप्न हे अजून तरी सत्यात उतरले नाही. राजकीय इच्छाशक्तींचा जिल्ह्यात कायमच दुष्काळ दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कोणत्याही पक्षाच्या राजकीय नेत्यांकडून या बाबत काहीच अपेक्षा नाही. हा विषय मार्गी लावण्यासाठी व्यापक जनरेटाच आता कामी येणार आहे. तीव्र जनरेट्यामुळेच विविध राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचे तरी निदान या विषयांकडे लक्ष केंद्रीत होईल.**

दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वाराणसी, उज्जैन प्रमाणे तिर्थक्षेत्र पंढरपूरच्या कॉरिडोरसाठी आग्रही आहेत. त्यामुळेच दस्तुरखुद्द पंतप्रधानाचेच पंढरपूर कॉरिडोर प्रकल्प होणे हे स्वप्न असल्यामुळे सहाजिकच कॉरिडोर प्रकल्प राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी ही राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आहे. त्यामुळे कॉरिडोर, नमामी चंद्रभागा अभियान, पंढरपूर विकास आराखडा आदी तिर्थक्षेत्र पंढरपूरसाठीचे खास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी खरोखरच स्वतंत्र पंढरपूर जिल्हा निर्मिती होणे आवश्यक आहे. मात्र यासाठी पंढरपूर आणि आसपासच्या तालुक्यातील नागरिकांचा व्यापक जनरेटा उभा करुन निदान हा विषय पुन्हा एकदा लावून धरणे आता गरजेचे बनले आहे. कारण स्वतंत्र पंढरपूर जिल्हा निर्मिती ही आता खरोखरंच काळाची गरज बनली आहे.

### चार दक्षकांपासून प्रतिक्षा

गेल्या चार दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या पंढरपूर जिल्हा निर्मितीचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या या मागणीला २०२१ मध्ये जिल्हा परिषदेच्या ठरावाचे बलस्थान लागल्यामुळे पुन्हा एकदा हा विषय चर्चेत आलेला होता. मात्र त्या नंतर चार ते पाच वर्षांचा कालावधी लोटला तरी या विषयाकडे जिल्ह्यातील कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याने गांभिर्याने पाहिले नाही. त्यामुळे चार दक्षकांपासून प्रतिक्षा असलेला हा विषय केव्हा मार्गी लागणार असा सवाल पंढरपूर आणि आसपासच्या तालुक्यातील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### पंढरपूरचे जिल्हा निर्मितीचे स्वप्न रखडले

पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस, करमाळा, माढा तसेच सांगली जिल्ह्यातील आटपाडी आणि जतचा काही भाग जोडून पंढरपूर या नवीन जिल्ह्याची निर्मिती करावी, अशी मागणी गेल्या चाळीस वर्षांपासून होत आहे. १९८१ मध्ये पंढरपूरचे तत्कालीन आमदार तात्यासाहेब डिंगरे यांनी विधानसभेत पंढरपूर जिल्हा करण्याची मागणी लावून धरली होती. त्यावेळचे मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी (कै.) डिंगरे यांच्या मागणीस सकारात्मक प्रतिसादही दिला होता. परंतु दुर्दैवाने त्याचवेळी अन्य काही जिल्ह्यांची निर्मिती करण्याची मागणी पुढे आली आणि मग पंढरपूर जिल्हा निर्मितीचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही.

### पंढरपूरच्या मागून दोन जिल्ह्यांची निर्मिती

सव्वीस वर्षांपूर्वी जुलै १९९८ मध्ये धुळे जिल्ह्याची विभागणी करून धुळे आणि नंदुरबार असे दोन जिल्हे करण्यात आले. २०१४ मध्ये महाराष्ट्रातील पालघर हा छत्तिसावा जिल्हा अस्तित्वात आला. ठाणे जिल्ह्याची विभागणी करून ठाणे आणि पालघर अशा दोन जिल्ह्यांची कामाच्या सोईसाठी रचना करण्यात आली. पंढरपूरच्या मागून नंदुरबार आणि पालघर हे दोन नवीन जिल्हे अस्तित्वात आले. परंतु पंढरपूरची मागणी मात्र दुर्दैवाने अजूनही कागदावरच राहिली आहे.

### भौगोलिकदृष्ट्या पंढरपूर मध्यवर्ती

पंढरपूर हे भौगोलिकदृष्ट्या सोलापूर जिल्ह्यात मध्यवर्ती आहे. माळशिरस, सांगोला, करमाळा तालुक्याआतील लोकांना सोलापूरला जाण्यासाठी शंभर ते सव्वाशे किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याातील लोकांना देखील सांगलीला जाण्यासाठी शंभर ते सव्वाशेहून अधिक किलोमीटरचे अंतर पार करावे लागते. त्यामुळे या तालुक्याकतील लोकांना जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयात जाणे त्रासाचे होते.

### लाखो नागरिकांची होईल सोय

पंढरपूर जिल्हा केल्यास पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस, करमाळा, माढा आणि आटपाडी या तालुक्यां तील हजारो नागरिकांची मोठी सोय होईल. त्यांचे प्रवासाचे अंतर निम्म्याहून कमी होईल. प्रवासाचा वेळ तसेच इंधनाची आणि पैशाची बचत होईल. प्रशासनातील अधिकाऱ्यांना जिल्ह्याच्या सर्व भागांशी तातडीने संपर्क साधता येईल. संबंधित सर्व तालुक्यांच्या विकासाला चालना मिळण्यास मोलाची मदत होईल.







महेश भंडारकवठेकर

पंढरपूर

७५८८०२०७६६


### सोलापूरवरील ताण कमी होवून यांत्राचे नियोजन होईल सुलभ

पंढरपूर हे राज्यातील नव्हे तर देशातील प्रमुख तिर्थक्षेत्र आहे. इथे आषाढी, कार्तिकीसह चार मोठ्या यात्रा भरतात. येथील विठुरायाच्या दर्शनासाठी दररोज लाखों भाविकांची मांदियाळी असते. त्यामुळे पंढरपूर जिल्हा झाल्यास जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासह अनेक शासकीय विभागांची नवीन जिल्हा कार्यालये पंढरपुरात होतील. तिथे नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याा होतील आणि सोलापूरच्या अधिकाऱ्यांवर पडणारा ताण साहजिकच कमी होईल. जिल्हा निर्मिती नंतर येथे नियुक्त झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांसह इतर अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामकाजा बरोबरच यात्रांचे देखील नियोजन करताना सोयीचे होईल.

### शासनाच्या तिजोरीवर आठशे ते एक हजार कोटींचा ताण

पंढरपूर जिल्हा निर्मिती झाल्यास या ठिकाणी विविध शासकिय कार्यालय बांधणे, शासकिय अधिकारी, कर्मचारी नियुक्त करणे, पगार करणे यासाठी शासनाच्या तिजोरीवर आठशे ते एक हजार कोटीचा ताण येणार आहे. मात्र दुसरीकडे लाडक्या योजनांवर कोट्यावधी रुपये खर्च करणाऱ्या सरकारला तिर्थक्षेत्र पंढरपूरच्या जिल्हा निर्मितीसाठी आठशे ते एक हजार कोटी रुपये खर्च करणे काही अवघड नाही. त्यामुळे शासनाने मनात आणले तर हे सहज शक्य होणार आहे.

### पंढरपूर जिल्ह्यात या तालुक्यांचा करता येईल समावेश

पंढरपूर जिल्हा करण्यासाठी पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस , करमाळा, माढा या तालुक्यींच्या बरोबरच सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यापचा तसेच जत तालुक्याच् काही भागाचा पंढरपूर जिल्ह्यात समावेश करता येणे शक्या आहे. या तालुक्यांचा समावेश झाला तर तेथील लोकांना देखील ते सोयीचे होईल.

### प्रस्तावित जिल्ह्यांच्या यादीत पंढरपूरचा समावेश नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्ये मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीने २२ नवीन जिल्हे प्रस्तावित केलेले आहेत. यापूर्वी २०१५ मध्ये माजी मंत्र्यांनी नवीन जिल्हे स्थापन करण्याची मागणी केली होती. त्यामध्ये काटोल (नागपूर), चिमूर (चंद्रपूर), पुसद (यवतमाळ), खामगाव ( बुलढाणा), अचलपूर (अमरावती) आणि अहेरी (गडचिरोली) हे नवीन जिल्हे प्रस्तावित केलेले होते. मात्र २०१८ मध्ये जे नवीन २२ जिल्हे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत त्या प्रस्तावित जिल्ह्यांच्या यादी मध्ये पंढरपूरच्या नावाचा कुठेही समावेश नाही.

### आषाढी यात्रेवेळी जिल्हाधिकाऱ्यांची झाली प्रचंड ओढाताण

पंढरपूर जिल्हा निर्मिती ही आता काळाची गरज बनली आहे. कारण आषाढी यात्रेच्या नियोजनासाठी यावर्षी जिल्हाधिकाऱ्यांची मोठी ओढाताण झाली. यात्रेच्या अगोदर पंधरा दिवस जिल्हाधिकारी एक दिवसाआड तरी पंढरपूरला येत होते.पंढरपूरच्या इतिहासा मध्ये प्रथमच ऐवढ्या मोठ्या संख्येने यावर्षी वारकरी भाविक आषाढी यात्रे मध्ये सहभागी झालेले दिसत होते. यात्रे मधील मुख्य दिवसांमध्ये जिल्हाधिकारी येथेच वास्तव्यास होते. त्यामुळेच यात्रा निर्विघ्न पार पडली.

### बारामतीकरांचा पहिल्या पासूनच विरोध, मात्र आता परिस्थिती वेगळी

पंढरपूर जिल्हा करण्यास सुरवातीपासून बारामतीकरांचा विरोध आहे. १९८० च्या दशकात जिल्ह्याची मागणी करण्यात आली होती. मात्र जिल्हा होणे अशक्य आहे. असे ज्येष्ठ नेते शरद पवार स्वत: सांगत होते. त्या नंतर त्याचीच रि त्यांचे पुतणे उपमुख्यमंत्री अजित पवार देखील ओढू लागले. यावरून बारामतीकराचा पहिल्यापासूनच याला विरोध होत असल्याचे दिसून येते. मात्र आता राजकीय परिस्थिती देखील वेगळी झालेली आहे. कारण शरद पवार आणि अजित पवार हे दोघेही आता वेगवेगळ्या पक्षात कार्यरत आहेत. त्यामुळे बारामतीकरांच्या विरोधाची जी सुरुवातीची धार होती ती आता काहीशी बोथट होवून दोघांच्या राजकीय चढाओढीत हा विषय मार्गी लागणे शक्य होईल. या बरोबरच राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. या मध्ये भाजपा, शिवसेना एकनाथ शिंदेगट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितपवार गट सत्तेतील सक्रीय राजकीय पक्ष आहेत. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिर्थक्षेत्र पंढरपूरच्या विकासासाठी कायमच आग्रही दिसत आहेत. त्यामुळेच पंढरपूर कॉरिडोर प्रकल्प, पंढरपूर विकास आराखडा, नमामी चंद्रभागा योजना आदी योजनाव्दारे मुख्यमंत्री पंढरीचा कायापालट करण्याच्या प्रयत्नात आहेत. एकंदरीत शहर तालुक्यातील जनरेट्यामुळे स्वतंत्र पंढरपूर जिल्हा निर्मितीचा देखील विषय सध्या मार्गी लागु शकतो.

### जिल्हा परिषदेच्या आँनलाईन सभेत ठराव मंजूर

पंढरपूर आणि आसपासच्या चार ते पाच तालुक्यातील नागरिक, शेतकरी यांना विविध कामासाठी सोलापूर येथे जाचे लागते. त्यासाठी त्यांचा वेळ व पैसा वाया जातो महणून पंढरपूर जिल्हा निर्मिती केल्यास कामे लवकर मार्गी लागतील त्यासाठी पंढरपूर जिल्ह्याची निर्मिती करावी असा ठराव सांगोला तालुक्या तील कोळा जिल्हा परिषद मतदार संघाचे माजी सदस्य सचिन देशमुख यांनी जिल्हा परिषदेच्या आँनलाईन झालेल्या ठराव मांडला. पंढरपूर तालुक्याआतील कासेगावचे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव देशमुख यांनी त्या ठरावास अनुमोदन दिले. विशेष म्हणजे सर्वानुमते हा ठराव मंजूर देखील झाला आहे. त्यावेळी जिल्ह्यातील आमदारांकडून हा विषय पुढे रेटला जाईल ही अपेक्षा होती. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे आता हा विषय लावून धरण्यासाठी आवश्यकता आहे ती म्हणजे केवळ आणि केवळ जनतेच्या रेट्याचीच.

# सोलापूर जिल्ह्यातील संत परंपरा

**महाराष्ट्र ही संतांची, संस्कृतीची भूमी आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात अनेक संत महात्मे होऊन गेले. यातील जवळजवळ सगळे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरला येऊन गेले आहे कारण सगळ्या विश्वासाचा तारणहार सर्वांचे आराध्य दैवत पांडुरंग श्री विठ्ठल पंढरपूरला विराजमान आहे त्यामुळे सोलापूर जिल्हा हा संतांचा जिल्हा आहे. असे म्हणायला हरकत नाही..या संतांनी संपूर्ण विश्वाला एक दिशा देण्याचे, जगण्याचे तत्व सांगणारे, जीवनाला आधार, आदर्श, अर्थ दिला. असे अवतारी पुरुष,संत, साधू, विचारवंत, तत्वज्ञानी महात्मे या भूमीवर होऊन गेले. या लोकांनी माणसाच्या आयुष्याचा, मनाचा, शरीराचा, भावभावनांचा खूप बारकाईने विचार केला. नेमके कसे जगले पाहिजे, जगण्याचे सार्थक कशात आहे ? माणसाचे आयुष्य कोणत्या गोष्टींनी परिपूर्ण होऊ शकते. आणि मुख्य म्हणजे माणसाने समाजासाठी काय केले पाहिजे हे त्यांनी सांगितले. त्याबरोबरच भक्तीचे महात्म्यही वाढवले. आजही संपूर्ण महाराष्ट्रातील लाखो लोक व सगळ्या संतांच्या पालख्या आषाढी कार्तिकी एकादशीला पंढरपूरला येतात. सोलापूरला संत महात्म्यांची खूप मोठी परंपरा आहे. केवळ वारकरी संप्रदायच नाही तर नाथ संप्रदाय, वीरशैव संप्रदाय ,समर्थ संप्रदाय, दत्त संप्रदाय याचेही अनेक संत सोलापूर जिल्ह्यात होऊन गेले आहेत...**










या संतांमध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचेही मोठे स्थान आहे विशेष म्हणजे सर्व जाती धर्मातील हे संत आहेत... सोलापूर जिल्ह्यातील निवडक संतांचा विचार या लेखात केला आहे .सोलापूर म्हटले की प्रथम वंदना श्री .सिद्धरामेश्वर यांना असते. श्री सिद्धरामेश्वर हे जसे योगी होते तसेच संतही होते. ते संवेदनशील भावकवी होते. त्यांनी कन्नड भाषेत६८ हजार वचने लिहिली आहेत .आज त्यांची १३०० वचने उपलब्ध आहेत . या वचनातून वीरशैवांचा षट्स्थल ,अष्टावरण, पंचाचार हा सिद्धांत विचार त्यांनी मांडला आहे. श्री सिद्धरामेश्वरांनी समाजाला एक दिशा दिली. श्रमदानाचे महत्त्व पटवून सांगितले. ४००० अनुयायांच्या श्रमदानातून जलाशय बांधला. त्याचप्रमाणे सिद्धरामेश्वरांनी ६८ लिंगांची स्थापना केली. आपल्या वचनातून त्यांनी वीरशैवांचे तत्त्वज्ञान, आचारधर्म समाज स्थिती याविषयी प्रबोधन केले. यातूनच त्यांच्या तत्त्वचिंतक, करुण, मानवतावादी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते .ते म्हणतात स्वर्ग म्हणजे सुख आणि नरक म्हणजे यातना.. सुख म्हणजे पुण्य आणि यातना म्हणजे दुःख. सुखाचा वियोग झाला तर दुःखाचा प्रलय येतो. दुःखाचा वियोग झाल्यावर सुखाची प्रचिती येते. हे कपिलसिद्ध मल्लिकार्जुन सुखाच्या संगतीने दुःख येत असते म्हणूनच आपण या सुखदुःखाच्या पासून अलिप्त राहिले पाहिजे. श्री सिद्धरामेश्वरांची वचने व त्यांचे कार्य प्रेरणादायी ,अजरामर आहे. श्री.सिद्धरामेश्वर यांच्याच काळात जगद्गुरु श्री महात्मा बसवेश्वर मंगळवेढ्याला काही काळ राहून गेले आहेत. त्यांनीही वीरशैव लिंगायत नवधर्माची शिकवण दिली. मातृभाषेत आपली वचने सांगितली श्रम प्रतिष्ठेला महत्त्व देऊन कर्मकांडापासून मुक्ती दिली. देवा पेक्षा देहाला महत्त्व देऊन एकेश्वराला भजावे असे सांगितले... त्यांचे कार्य विचार खरोखरच अलौकिक आणि कालातीत आहेत.

भक्त शिरोमणी संत नामदेव हे जरी नरसी बामणी या गावचे असले तरी त्यांचे सगळे आयुष्य मात्र पंढरपूरलाच गेले. त्यामुळे ते पंढरपूरचे झाले. संत नामदेवांनी पंजाब पर्यंत वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. भक्ति हीच जीवननिष्ठा मानून नामभक्तीच्या जोरावर स्वतःचाही उद्धार केला व समाजालाही विठ्ठल नामाचे महत्त्व पटवून सांगितले. नाचू कीर्तनाच्या रंगी ! ज्ञानदीप लावू जगी !! या भूमिकेने वारकरी कीर्तन संप्रदायाची स्थापना करून त्यांनी वारकरी संप्रदायाला जनमानसात नेऊन पोहोचवले. भक्ती मार्गात उच्च नीच भाव नाही. हे तत्व पटवून जनाबाई सारख्या दासीच्या जीवनाला अलौकिकत्वाचा अर्थ प्राप्त करून दिला. भक्ती मार्गाने उद्धरून गेलेल्या नामदेवांची भक्ती हीच जीवननिष्ठ होती बहुजन समाजात त्यांनी भक्तीचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळेच बहुजन समाजातील अनेक जण विठ्ठलाची भक्ती करून संत पदाला पोहोचले.. संत नामदेवांनी आयुष्यभर भक्ती, चारित्र्य, समता, मानवता यांचा उपदेश केला. भक्तिमार्गाने कुणालाही परमेश्वर प्राप्त करून घेता येतो त्यामध्ये जातीपातीचा प्रश्न येत नाही. हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. ते त्यांचे कार्य अलौकिक स्वरूपाचे आहे. भक्तिमार्गाची ही वाट त्यांनी पंजाब पर्यंत नेऊन पोहचवली . संत नामदेवाचे सर्व कुटुंबीय विठ्ठल भक्त होते. नामदेवांच्या आई ,पत्नी, बहीण, मुले या सर्वांनी विठ्ठल भक्तीचे महत्त्व सांगणारे अभंग लिहिले. पंढरपूरचे संत परिसा भागवत हे नामदेवांचे पहिले शिष्य. त्यांनी सुद्धा पंढरीवर वर्णनात्मक अभंग लिहिले आहेत .संत जनाबाई ही नामदेवा घरची दासी.. शूद्र जातीची. तरीही भक्तीची उत्कटता व स्त्री मनाचा हळुवार पणा तिने अभंगातून व्यक्त केला आहे.. सामान्य स्त्रीचे जीवन, तिचे मन, तिच्या भावना संत जनाबाईच्या अभंगातून दिसून येतात. या अभंगातून तिचे कष्ट, परमेश्वराशी एकरूपता आपल्याला दिसते. मंगळवेढ्याचे संत चोखामेळा यांचेही स्थान वारकरी संप्रदायात खूप मोठे आहे. त्यांची पत्नी सोयराबाई, त्यांची बहिण निर्मळा , मेहुणा बंका हे सर्वजण विठ्ठल भक्त होते.शूद्र असल्याने अपमान अवहेलना सहन करत त्यांनी संसार केला. भक्तिमार्गातील आपले अनुभव अभंगातून मांडले. आपण अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळे आपल्याला जी हीन वागणूक मिळाली त्याचा पहिल्यांदा उल्लेख चोखामेळ्यांनी केला आहे. आपल्या वैयक्तिक, सामाजिक, अध्यात्मिक अनुभवावर त्यांचे अनेक अभंग आहेत . पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी असे त्यांनी म्हटले आहे. सोलापूर जवळील अरण गावचे संत सावता माळी हे वयाने,अधिकाराने, अनुभवाने ज्येष्ठ होते. शेतीचा व्यवसाय करत त्यांनी भक्ती भावाचा मळा फुलवला. त्यांचे अभंग उत्कट आणि सहजस्फूर्त आहे. कांदा मुळा भाजी ! अवघी विठाबाई माझी !! हा त्यांचा अभंग लोकप्रिय आहे. त्यांनी भक्ती प्रेमाची फुले फुलवली. मंगळवेढ्याचे श्री दामाजीपंत हे सोलापुरातील महत्त्वाचे संत.. दामाजीपंत यांनी दुष्काळात लोकांना धान्य वाटले. हजारो लोकांचे प्राण वाचवले. त्यावेळी विठ्ठलाने त्या धान्याची किंमत भरली असे म्हणतात. संत नरहरी सोनार हे ही पंढरपूरचेच होते. त्यांचा परंपरागत व्यवसाय सोनार कामाचा होता. ते शिवभक्त होते. परंतु शिवभक्ती कडून ते विठ्ठल भक्ती कडे आले आणि पांडुरंगाचे दास झाले. देवा तुझा मी सोनार ! तुझ्या नामाचा व्यवहार !! असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्यामुळे हरिहर हा भेद मिटून गेला. समाजाला शिव आणि विष्णू एकच आहे याचा साक्षात्कार झाला. या संत परंपरेत मंगळवेढ्याची संत कान्होपात्रा ही अतिशय लहान वयात विठ्ठल भक्तीने उद्धरुन गेली. खरंतर ही एका गणिकेची मुलगी.. अत्यंत सुंदर, परंतु विठ्ठलाची भक्ती करताना ती त्याच्या रूपात विलीन झाली. तिचे अभंग थोडे आहेत पण त्यात कारुण्य आणि अर्तता आहे. असं म्हणतात की वयाच्या चौदाव्या वर्षी विठ्ठलाच्या पायाशी तिने प्राण सोडला.. संत सेना न्हावी हे सुद्धा नंतर पंढरपूरला येऊन राहिले होते. त्यांनी पंढरीचा महिमा आपल्या अभंगातून व्यक्त केला आहे.

प्रा.डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर

सोलापूर

९३२५०४६४१५


सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे संत म्हणजे माणकोजी बोधले.. ग्रामीण महाराष्ट्रात त्यांची लोकप्रियता मोठी आहे. मूळचे ते सासवडचे असले तरी नंतर ते सोलापूर जवळ येऊन राहिले. त्यांच्या अभंगातूनही संसाराची असारता, नाममहिमा , विठ्ठलभक्ती गुरु महिमा, पंढरी वर्णन आलेले आहे. सोलापुरातील संत शुभराय महाराज हेही मोठे संत होऊन गेले. ते टिपू सुलतानच्या राज्यात नायब दिवाण होते. धार्मिक मतभेदामुळे सर्वसंग परित्याग करून ते पंढरपुरास आले. तिथे काही काळ विठ्ठल भक्ती करून सोलापुरात राहिले. त्यांनी सोलापुरात मठ स्थापन केला. या मठात विठ्ठलाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. ते बहुभाषा पंडित व कलाकार होते. अक्कलकोटचे स्वामी समर्थ व पुण्याचे शंकर महाराज हे काही काळ त्यांच्या मठात राहिले होते. सोलापूरच्या धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात संत शुभराय महाराजांचे योगदान मोठे आहे.. याशिवाय संत गोळवणीकर महाराजांनी भक्ती कशी करावी भक्ती किती श्रेष्ठ आहे हे आपल्या स्फोटकाव्यातून सांगितले सांगोल्या तालुक्यातील खर्डी गावाजवळील श्री संत सिताराम महाराज हे संन्यासी वृत्तीचे असल्याने त्यांनी अर्चन भक्ती विषयी विवेचन केले आहे.. संत नामदेवांच्या काळात सोलापूर जिल्ह्यातील बार्शी गावचे योगा परमानंद एक महान भागवत भक्त होऊन गेले भगवंताला प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी कठोर आचरण केले त्यांना परमानंद नावाच्या साधू पुरुषांनी गुरुपदेश केला म्हणून त्यांनी योगा परमानंद हे नाव धारण केले योगा हे जातीने सुधर असले तरी विठ्ठलाच्या नामस्मरणाने नित्यनेमाचे पालन करण्यामुळे ते श्रेष्ठ भक्त झाले

अलीकडच्या काळातील सोलापूर जवळील माचणूर या गावचे श्री संत बाबा महाराज आर्वीकर हे सुद्धा श्रेष्ठ भक्त होते. मुळचे विदर्भातले असले तरी त्यांनी आपले उर्वरित आयुष्य परमेश्वर भक्तीत घालवले. परमार्थिक वाट सोपी करण्यासाठी ते साध्या सोप्या सरळ भाषेत सर्वसामान्य माणसांना भक्तिमार्गाचे महत्त्व पटवून देत... सोलापूर जिल्हा खरोखरच अतिशय भाग्यवान आहे. कारण या जिल्ह्यात अनेक संत होऊन गेले. जगाच्या कल्याणा संतांची विभूती हे वाक्य त्यांनी खरे करून दाखवले. या संतांमुळेच माणसातील भेदभाव , मत्सर ,उच्चनीच भाव नाहीसा होऊन समाजामध्ये समता, मानवता, बंधुभाव ,प्रेम, करुणा निर्माण झाली .या सर्व संतांनी विठ्ठल भक्ती करता करता समाजाला मानवतेचा संदेश दिला. जात ,धर्म, पंथ यापेक्षा माणूस महत्त्वाचा आहे. त्याची भक्ती महत्त्वाची आहे. हा संदेश दिला. म्हणूनच आजही पंढरपूरला लाखो लोक न बोलवता येतात आणि कुठलाही भेदभाव न पाळता सर्वांशी प्रेमाने वागतात. हे सोलापूर जिल्ह्याचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य आहे.. या सर्व संताच्या चरणी नतमस्तक आहे.




सोलापूर
**तरुण भारत**
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा




आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित

## वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला

**अध्यक्षा : श्रीमती कौशल्यादेवी शिंदे मॅडम**

## शहीद अशोक कामटे बहुद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला

कार्यक्षेत्र - महाराष्ट्र राज्य - ४१३३०७

**संस्थापक निळकंठ शिंदे सर**

---

An ISO 9001 : 2015 Certified Institute
॥ विद्याधनं सर्वधनं श्रेष्ठम्॥

रजि. नं. महाराष्ट्र /९४२/२००७ दि.८/८/२००७

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे,

## शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला

(Approved by A.I.C.T.E., New Delhi, Recognized by Govt. of Maharashtra Approved by D.T.E., Mumbai, Affiliated to M.S.B.T.E, Mumbai)

सर्व्हे नं. ७६/१, ७७, सांगोला–जत रोड, ता. सांगोला, जि. सोलापूर – ४१३३०७

Contact : 9763328461, 8308216591
9967052597, 7709643611

Institute Code : 1208
D.T.E. Code : D-6471

**मान्यताप्राप्त कोर्सेस**

- मेकॅनिकल इंजिनिअरींग
- कॉम्प्युटर इंजिनिअरींग
- सिव्हील इंजिनिअरींग
- इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन इंजि.
- इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग




■ Web : www.spcsangola.com ■ E-mail : spc_sangola@yahoo.com

---

सोलापूर **तरुण भारत**
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा.

S C P M
स्थापना : २००५

संस्थापक अध्यक्ष
**डॉ. दिलीपकुमार इंगवले**



शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचलित,

## सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी

मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर ४१३३०७

**-: महाविद्यालयास यांची मान्यता :-**

भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद, नवी दिल्ली (पी.सी.आय), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (डि.टी.ई) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिषद मुंबई (एम. एस.बी.टी.ई) संलग्नित.

**-: अभ्यासक्रम :-**

**अभ्यासक्रमाचे नाव**
१. डी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदविका)
२. बी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदवी)
३. एम. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदयुत्तर) (फार्मासुटीकल केमिस्ट्री)

**महाविद्यालयाचे वैशिष्टये**

* अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद उत्कृष्ठ निकालाची परंपरा सुसज्ज व सर्व सोयीयुक्त प्रयोगशाळा * प्रशस्त इमारत व सर्व सोयीयुक्त क्लासरुम महाराष्ट्र शासनाच्या व भारत सरकारच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वसतिगृह विविध संशोधनास स्वतंत्र ॲनिमल हाऊस * सर्व सेवा सुविधा युक्त खानावळ व उपहारगृह परिवहन सुविधा व पार्किंग व्यवस्था महाविद्यालय परिसर सीसीटीव्ही (CCTV) च्या निगराणी खाली सर्व पुस्तके व सोयीयुक्त डिजिटल लायब्ररी २४ तास विद्युत सुविधा विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंटची सुविधा सुसज्ज व सर्व सोयीयुक्त मशीन रुम * सेंट्रल इन्स्ट्रयुमेंट लॅब संशोधन प्रयोगशाळा अंतर्गत व बहिर्गत खेळाची सुविधा व खेळाची मैदान

-: शुभेच्छुक :-
**शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचलित,**

## सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी

मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर
ईमेल आयडी: sahyadrisangola@gmail.com वेबसाईट: www.sahyadripharmacy.org
संपर्क : ९३३६२७७७७७/९८२३१०७३७१

---

**!! दैनिक तरुण भारत वर्धापन दिन शुभेच्छा !!**

शुभेच्छुक
सां.ता.उ.शि.मंडळाचे,

## सांगोला महाविद्यालय, सांगोला

कडलास रोड, सांगोला जि.सोलापूर-४१३३०७
फोन नं.७५८८३६०४०६

नॅक ग्रेड - बी | विद्यापीठ (AAA) ग्रेड-ए
Website - www.sangolacollege.org | email- prinsesgl@gmail.com

**महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रम शिकविण्याची सुविधा**

**कोर्सेस** - बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी.(ई.सी.एस.), बी.सी.ए.,एम.एस्सी.(ऑरगॅनिक केमिस्ट्री), एम.एस्सी.(संगणकशास्त्र), एम.एस्सी.(AIML), एम.सी.ए.,एम.ए. मराठी व हिंदी, टॅली कोर्स(ERP-9) यु.जी.सी. मान्यता असलेले कौशल्यावर आधारीत लघुकालीन अभ्यासक्रम इ. कोर्सेस.

**महाविद्यालयाची वैशिष्टये**

- अद्यावत १२ - विज्ञान व १५ संगणक प्रयोगशाळा.
- प्लेसमेंट सेल तर्फे विविध कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्हूवची सोय.
- कम्यूनिकेशन डेव्हलपमेंटसाठी इंग्रजी लैंग्वेज लॅबची सोय.
- सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिका
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- मुले व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह
- शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध
- विद्यापीठ परीक्षा निकालाची उज्वल परंपरा
- सुसज्ज कीडा संकुल व भव्य मैदान, ४०० मी. ट्रॅक (८ लेन)
- व्यक्तीमत्व विकासासाठी एन.एस.एस.व एन.सी.सी. उपलब्ध

**- कॅम्पस रिक्रूटमेंट सेल -**

- आतापर्यंत २२०० हून अधिक विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये प्लेसमेंट

**आमचे मार्गदर्शक**

| **डॉ. सुरेश भोसले** | **श्री. ॲड. उदय (बापू) घोंगडे** | **श्री. बाबुरावजी गायकवाड** |
|---|---|---|
| प्रभारी प्राचार्य | सेक्रेटरी | अध्यक्ष |
| सांगोला महाविद्यालय, सांगोला | सां.ता.उ.शि.मंडळ, सांगोला | सां.ता.उ.शि.मंडळ, सांगोला |




आशीर्वाद

स्व.महादेव आवताडे

लोकप्रिय आमदार







सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



मा.सोमनाथ आवताडे
मा.सभापती, बाजार समिती



मा.विनायक राऊत
लोकनियुक्त सरपंच



मा.संजय आवताडे
चेअरमन, आवताडे शुगर

मा.समाधानजी आवताडे साहेब

शुभेच्छुक

- मा.श्री.विनायक माधवराव यादव
- लोकनियुक्त सरपंच मारापूर ग्रामपंचायत
- अध्यक्ष, माणगंगा शिक्षण मंडळ संचलित, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, ता.मंगळवेढा

# विकसनशील सोलापूर

सोलापूर तरुण भारत

रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५

वर्धापनदिन विशेष







**आपल्या सोलापूरला अतिशय प्राचीन आणि समृद्ध वारसा लाभलेला आहे. इ.स. पूर्व २०० वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बहामनी, निजामशाही, आदिलशाही,मराठे-पेशवे ब्रिटिश या सर्व राजवटी सोलापूरने अनुभवल्या आहेत. सोन्नलगी, सोन्नलपूर, गिरणगाव, हुतात्म्यांचे शहर ते स्मार्ट सिटी सोलापूर असा सोलापूरचा प्रवास अत्यंत अभिमानास्पद आहे. तसेच सोलापूरचा विकास टप्प्याटप्प्याने होत गेला आहे. सोलापूरला ऐतिहासिक वारसा जसा लाभला आहे तसा देशभक्ती, सांस्कृतिक, साहित्यिक व धार्मिक वारसाही अतिशय संपन्न आहे. तीन दिवस का असेना पण स्वातंत्र्यपूर्व स्वातंत्र्य उपभोगलेले शहर म्हणून इतिहासाने अभिमानपूर्वक सोलापूरची नोंद घेतली आहे. स्वातंत्र्य चळवळीत चार हुतात्म्यांच्या बलिदानाने सोलापूर अजरामर झाले.**



# चला पर्यटनाला... सोलापूरला

सोलापूर महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने चौथ्या क्रमांकाचा जिल्हा आहे. २८ जानेवारी २०१६ भारत सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेतील पहिल्या वीस शहरात सोलापूरचा समावेश करण्यात आला. सोलापूरने महाराष्ट्रातील शहरांच्या चौथ्या स्थानावरून एकदम दुसऱ्या स्थानावर उड्डाण केले.

सोलापूर कला, क्रिडा, साहित्या बरोबरच पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा जिल्हा आहे. आयुष्यात अनुभवी, प्रखर बुध्दीमान व्हायचे असेल तर पर्यटनाचे महत्त्व अनेक विभुतींनी विशद केले आहे. संत ज्ञानराज माऊली म्हणतात

**सृष्टीमध्ये बहु लोक ।**
**परिभ्रमणे कळे कौतुक ।**
**चुकोनी उदंड आढळते ।**

या अनंत सृष्टीत अनेक माणसं, निसर्ग चमत्कार, आश्चर्ये आहेत. कधी कधी अगदी सहजच हे दृष्टीस पडते. हे अनुभवण्यासाठी भ्रमंती गरजेची आहे असे माऊली ममतेने सांगतात. तर जगतगुरु संत तुकाराम महाराज म्हणतात.


नित्य नूतन हिंडावे। उदंड देशाटन करावे।

नेहमी नवनवे प्रदेश हिंडावेत. भरपूर फिरावे म्हणजे अनुभव संपन्नता येते.

**केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार ।**
**शास्त्र ग्रंथ विलोकन,मनुजा येतसे चातुर्य फार।।**

मोरोपंतांनी विद्वानाशी मैत्री आणि सभेत संचार या दोन्हींच्याही आधी देशाटनाला स्थान दिले आहे यावरून पर्यटनाचे महत्त्व अधोरेखित होते.या मोरोपंतांच्या आर्येनुसार सोलापूरने पर्यटकांना नुसते चातुर्य बहाल केले नाही तर पर्यटनासाठी सातत्याने आपल्याकडे आकर्षित करून घेतले आहे.

दोन तालुक्यांसह सोलापूर शहर आणि सोलापूरचे



इतर नऊ तालुके पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या उत्तरेस अहिल्यानगर व धाराशिव जिल्हे, पश्चिमेला सांगली, सातारा, पुणे जिल्हे दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्यातील विजयपूर जिल्हा अशा सीमा आहेत. त्यामुळे सोलापूरातून इतर जिल्ह्यांतील पर्यटन स्थळे पाहणे अधिक सोयीस्कर आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या तत्वानुसार सोलापूर विभाग म्हणजे यात्रा विभाग मानला जातो.

**सोलापूर - १. सिद्धेश्वर मंदिर -** श्रीशैल येथील मल्लिकार्जुन यांचे भक्त श्री सिद्धरामेश्वरांनी गुरूच्या सुचनेनुसार हे मंदिर बांधल्याचे समजते. मंदिर भुईकोट किल्ल्याच्या पुढे असलेल्या मनोहारी तलावाच्या मध्ये बांधलेले असून मुख्य मंदिर परिसरात सिद्धरामेश्वरांची मूर्ती असलेले गर्भगृह, मुख्य प्रांगणात ६८ शिवलिंगे, अमृतलिंग, नंदी, विठ्ठल रुक्मिणी मंदिरासह इतर स्थाने आहेत. जानेवारी



महिन्यात सिध्दरामेश्वरांची मोठी यात्रा भरते. या यात्रेला 'गड्डा' किंवा गड्ड्याची यात्रा म्हणतात. महाराष्ट्रासह कर्नाटकातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. यात्रेत संक्रांतीच्या वेळी मानाच्या नंदीध्वजांची मिरवणूक असते. सिद्धरामेश्वरांचा दंड व कंभार कन्या यांचा अक्षता सोहळा पहायला शेकडो लोक येतात.

**२. भुईकोट किल्ला -** सोलापूरचा भुईकोट किल्ला हा महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. चौदव्या शतकात बहामनी राजवटीत हा किल्ला बांधला गेला. येथे औरंगजेब, दुसरे बाजीराव पेशवे, सातारचे प्रतापसिंह भोसले यांचे वास्तव्य होते. खंदकाच्या आत भक्कम दुहेरी तटबंदी, २२ बुरुज , तोफा ठेवण्यासाठी व तोफमारा करण्यासाठी झरोके आहेत. किल्ल्याच्या आत अनेक इमारती व मंदिराचे अवशेष दिसतात. १९३० साली महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित.

**३. रेवण सिद्धेश्वर मंदिर -** हे संभाजी तलावाजवळचे प्राचीन शिवमंदिर आहे. संक्रांतीच्या वेळी जवळच जनावरांचा मोठा बाजार भरतो. तसेच तेथून जवळच म. गांधी प्राणी संग्रहालय आहे.

**४. मल्लिकार्जुन मंदिर -** भुईकोट किल्ल्यात काही



इमारती बुजलेल्या असाव्यात असे वाटल्याने उत्खनन केले असता एका शिव भक्ताला मूर्ती व शिवलिंग सापडले. हेच शिवलिंग घेऊन बाळीवेस येथे मंदिर बांधले. या मंदिराचे बांधकाम दगडी आहे. श्रावण महिन्यात भक्तांची गर्दी असते.

**५. शिवगंगा मंदिर -** शंभर तोळे सोन्याचा कळस व ऐंशी किलो चांदीचा दरवाजा असे म्हणतात.

**६. रुपा भवानी मंदिर -** ही देवी सोलापूर शहराचे रक्षण करते अशी धारणा आहे.

याशिवाय हुतात्मा बाग, हुतात्मा स्मृती मंदिर, स्मृती उद्यान, इंद्र भुवन - महानगरपालिका, संभाजी तलाव,हिप्परगा तलाव, बाळे येथील खंडोबा मंदिर, साईबाबा मंदिर, नान्नज येथील माळढोक अभयारण्य अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे पर्यटकांची हौस पुरवीत आहेत.







**संध्या धर्माधिकारी**

**सोलापूर**

**९९२२१५६३३५**


**१) अक्कलकोट -** सोलापूर ते अक्कलकोट हे अंतर ३८ कि.मी. असून दर अर्ध्या तासाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. अक्कलकोट हे संस्थान असून १७६० ते १९६५ या कालावधीत छ. शाहू महाराज थोरले यांचे मानसपुत्र फतेहसिंहराजे भोसले ते विजयसिंहराजे भोसले या संस्थानिकांची सत्ता होती. स्वातंत्र्योत्तर काळात अक्कलकोट संस्थान मुंबई इलाख्यात विलिन करण्यात आले. अक्कलकोट येथे जुना राजवाडा व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तू आहेत. त्याचबरोबर ' अक्कलकोट संस्थान शस्त्रागार' नावाचे एका शंभर वर्षाहून जुन्या, देखण्या वास्तूत आशिया खंडातील सर्वात मोठे शस्त्रागार आकारास आले आहे. हे शस्त्रागार इतिहासाची नेत्रदीपक माहिती देते. प्रत्येकाने आवर्जून पाहावे असेच हे शस्त्रागार आहे.

येथे महाराष्ट्र व इतर राज्यातील स्वामी भक्तांचे आराध्य श्री स्वामी समर्थांचे वास्तव्य असलेले पवित्र स्थान. येथे वटवृक्ष मंदिर, श्रीस्वामी समाधी मठ, जोशी बुवांचा मठ, शिवपूरी, शेखनूर दर्गा इत्यादी स्थळे पाहता येतात. येथील अन्नछत्रातील महाप्रसादाचा लाभ घेता येईल.

अक्कलकोट पासून ७४ कि.मी. अंतरावर श्रीक्षेत्र गाणगापूर आहे. एसटी बस व रेल्वेने जाता येते. तेथे श्री. दत्तात्रेय, श्री.नरसिंह सरस्वती, भिमा, अमरजा संगम दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येतो.

**२) करमाळा -** हा सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचा तालुका. सोलापूर ते करमाळा अंतर १२३ कि.मी. असून येथे जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. येथील श्री कमलादेवी मंदिर प्रसिद्ध आहे. हे मंदिर फलटणचे बजाजी नाईक निंबाळकर यांचे पणतू श्री राऊराजे / रावरंभा नाईक निंबाळकर यांनी १७२७ मध्ये बांधले असून त्याचे बांधकाम हेमाडपंथी शैलीतील आहे. या स्थानाला तुळजाभवानी मातेचे दुसरे पीठ मानले जाते. राऊराजे यांच्या जहागीरीत ९६ खेडी होती. त्याचे प्रतिक म्हणून मंदिराला ९६ खांब आहेत. मंदिरात ९६ ओवऱ्या आहेत. मंदिरात ९६ शिल्पचित्रे रेखाटलेली आहेत. मंदिराच्या समोर असलेल्या दिपमालेला वर जाण्यासाठी आतून ९६ पायऱ्या आहेत.इतकेच नाही तर मंदिरासमोर असलेल्या विहीरीला ९६ पायऱ्या आहेत. एकंदरीतच या मंदिरात ९६ अंकाला अनन्यसाधारण महत्त्व



असल्याचे दिसून येते. नवरात्र मोठ्या भक्तिभावाने साजरे केले जाते. कार्तिक महिन्यात यात्रा भरते.

करमाळा स्वातंत्र्यसैनिक व ज्येष्ठ पत्रकार शंकरराव येवले यांची कर्मभूमी. अलीकडेच अतिशय लोकप्रिय झालेल्या सैराट चित्रपटात दाखविण्यात आलेले मंदिर व हत्ती बारव यांना सुमारे २९८ वर्षांचा इतिहास आहे.

**३) पंढरपूर -** सोलापूरपासून अवघ्या ७२ किमी अंतरावर आहे. सोलापूरहून पंढरपूरला महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध आहेत. याशिवाय कुर्डुवाडी येथून रेल्वेची सुविधा उपलब्ध आहे.

**आधी रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी ।**
**जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपूर ।।**

असे संत नामदेव पंढरपूरचे वर्णन करतात.

श्रीक्षेत्र पंढरपूर हे भुलोकीचे वैकुंठ, वैष्णवांची दक्षिण काशी म्हणून प्रख्यात आहे. वारकऱ्यांचे आराध्य,लोकदैवत महाराष्ट्राचे चिरंतन स्फूर्तीस्थान आहे. इथे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथील भाविक भक्तीभावाने दर्शनासाठी येत असतात. संत नामदेव, संत नरहरी महाराज, संत जनाबाई यांची कर्मभूमी म्हणजे पंढरी.

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अतिशय पुरातन म्हणजे १६-१८ व्या शतकातील असल्याचे मानले जात असले तरी १२ व्या शतकातील मुळ मंदिराचे अवशेष अजूनही तिथे सापडतात. गाभारा, अंतराळ, सभामंडप हे मुख्य घटक असून सोळा खांबापैकी एक चांदीने मढविलेला खांब आहे तोच गरुड खांब होय. मंदिरातील मदनाच्या पुतळ्याची मूर्ती भक्त पुंडलिका वरील भक्तीने प्रभावित होऊन पांडुरंग मूर्तीच्या रुपात अठ्ठावीस युगे उभी आहे म्हणजे स्वयंभू आहे असे मानले जाते. ही मूर्ती काळ्या पाषाणातील असून तिची उंची सुमारे तीन फूट नऊ इंच आहे. ही मूर्ती कमरेवर हात ठेवलेल्या स्थितीत आहे. मूर्तीच्या चेहऱ्यावर सुबकता नाही. ती काहीशी ओबडधोबड आहे. पण विठ्ठलाचे मुखावलोकन करताच जन्मोजन्मीचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. बाजूलाच



रुक्मिणीमातेचे मंदिर आहे. चंद्रभागा तिरावरील भक्त पुंडलिक समाधीमंदिर, नरहरी महाराज समाधी, गोपाळपूर आहे. याशिवाय इतर हिंदू देवतांची मंदिरे व कैकाडी महाराज मठासारखे संतांचे मठ आहेत. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या एकादशीला मोठ्या प्रमाणात भाविक येतात. महिन्याची वारी करणारेही वारकरी आहेत.

पंढरपूरपासून दिड तासाच्या अंतरावर असलेल्या छ. शिवाजी महाराजांचे तथा समस्त भोसले कुळाचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूरच्या महादेवाला जाता येते. माळशिरस येथूनही राप बसेस उपलब्ध आहेत.

**४) बार्शी -** सोलापूर पासून ६९ किमी अंतरावर बार्शी तालुका आहे. सोलापूर येथून राप बसेस उपलब्ध आहेत. बार्शीला मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणतात. बार्शी



मध्ये बारा ज्योतिर्लिंग आहेत म्हणून बार्शी हे नाव पडले अशी अख्यायिका आहे. बार्शीला 'भगवंत नगरी' म्हणूनही ओळखले जाते. येथील भगवंत मंदिर प्रसिद्ध आहे. हे भारतातील एकमेव विष्णू मंदिर आहे. येथे पंढरपूरप्रमाणेच एकादशीला भक्त दर्शनासाठी येतात.

**५) मंगळवेढा -** मंगळवेढा सोलापूर पासून ५४ किमी व पंढरपूरपासून २१ किमी अंतरावर आहे. सोलापूर, पंढरपूर येथून राप बसेस उपलब्ध आहेत.

मंगळवेढ्याची ऐतिहासिक व धार्मिक परंपरा अतिशय मोलाची आहे. शालिवाहन शकाच्या सुरवातीला मंगळवेढे मंगल राजाच्या अधिपत्याखाली होते असे म्हटले जाते. मंगळवेढ्याची ज्वारीचे कोठार म्हणून ओळख आहे. संत दामाजी, संत चोखामेळा, संत सोयरा, निर्मळता, कर्ममेळा इत्यादी संतांच्या वास्तव्यामुळे मंगळवेढे संतभूमी म्हणूनही ओळखले जाते.

मंगळवेढ्यापासून तेरा किमी अंतरावर असलेल्या माचनूर येथे भिमा नदीच्या काठावर हेमाडपंथी प्राचीन शिवमंदिर आहे. नदीपात्रात जटा शंकर मंदिर आहे. औरंगजेब इथे चार वर्षे वास्तव्यास होता. तेव्हा त्याने या मंदिरातील सिद्धेश्वराला जाणिवपूर्वक नैवेद्यात मांस पाठवून दिले पण त्याची शुभ्र फुले झाली. म्हणजे मांसाचा नूर पालटला म्हणून ते स्थान मांसनूर अर्थात माचनूर झाले अशी अख्यायिका आहे. औरंगजेबाला देवाची प्रचिती आली म्हणून औरंगजेबाने या मंदिराला पुजा अर्चेसाठी अर्थसहाय्य केले. आजही सरकारातून वर्षासन दिले जाते.

**६) माढा -** माढ्याला बार्शी, पंढरपूर ही जवळची शहरे असून सोलापूर पासून ६३ किमी अंतरावर आहे. माढा मणकर्णा नदीच्या काठावर वसलेले आहे. इथे माढेश्वरीचे हेमाडपंथी मंदिर आहे. याच माढेश्वरी देवीच्या नावावरून माढा हे नाव पडले आहे. सोलापूरची जीवनदायिनी ठरलेले उजनी धरण याच तालुक्यातील उजनी गावानजीक आहे.

माढा तालुक्यातील अरण हे विठ्ठलाचा परम भक्त संत सावता माळी यांची कर्मभूमी आहे. त्यांची पत्नी भेंड या गावची त्यामुळे या दोन्ही गावांना धार्मिक महत्त्व आहे. कव्हे येथील सीना नदीवर आशिया खंडातील सर्वात मोठा बोगदा आहे.

**७) माळशिरस -** अकलूज शहराजवळ आहे. हे तालुक्याचे ठिकाण असून इथून अर्ध्या तासाच्या अंतरावर



पुणे जिल्ह्यातील नीरा नरसिंहपूर येथे लक्ष्मी नृसिंह मंदिर आहे.

**८) मोहोळ -** मोहोळ सोलापूर पासून ३३ किमी अंतरावर आहे. राप बसेस उपलब्ध आहेत. येथून जवळच वडवळ येथे श्री नागनाथ मंदिर आहे. ' ज्यांना न घडे काशी त्यांनी जावे वडवळाशी' असे येथील स्थान महात्म्य आहे.

**९) सांगोला -** सोलापूर पासून ८५ किमी अंतरावर सांगोला असून सांगली जिल्ह्याच्या सीमेवरचा तालुका. राप बसेस व रेल्वे सेवा उपलब्ध आहे. येथून जवळच असलेल्या नाझरे येथील श्रीधरस्वामी मठ आहे. सांगोला डाळिंब उत्पादक तालुका म्हणून ओळखला जातो.

सोलापूर येथून ४५ किमी अंतरावर असलेल्या छ. शिवाजी महाराजांची कुलदेवी श्री तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरला जाणे अगदी सोयीचे आहे. राप बसेस सतत उपलब्ध आहेत.

असा हा आमचा सोलापूर जिल्हा व शहर पर्यटन जिल्हा म्हणून लोकप्रिय आहे. तर अवश्य या आणि पर्यटनाचा आस्वाद घ्या.






# प्रेक्षकांवर हुकुमत गाजवणारी लावणी नृत्यांगना



योगेश शुक्ल
जळगाव
९६५७७०१७९२



**एकेकाळी तमाशा क्षेत्रात दुमदुमलेले नाव. वयाच्या १० व्या वर्षापासून पायात घुंगरू बांधून कलाकार म्हणून प्रेक्षकांवर हुकुमत गाजवणारी लावणी नृत्यांगना. सावळा, परंतु देखणा चेहरा, गोड गळा आणि त्याच्या वरचढ अभिनय अशा कोंदणात चमचमणा-या विठाबाई नारायणगावकर यांचा दि. १६ जुलै जन्मदिन. (जन्म. १६ जुलै १९३५)**

पुरुषांच्या जगात वावरलेल्या विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर जिवंतपणीच दंतकथा बनल्या. लफडेबाज, विकृत, व्यसनाधीन असे हिणवून निंदानालस्ती करणा-यांची पर्वा न करता मायबाप प्रेक्षकांनी विठाबाईना 'तमाशासम्राज्ञी' ही पदवी बहाल केली. लहानपणापासून होत असलेली उपासमार, वयाच्या दहाव्या वर्षापासून सुरूझालेली विठाबाईची तालीम, १५ वर्षे वयाच्या कोवळ्या वयात एका व्यापा-याने केलेला बलात्कार, त्यातून स्वतःच्या तारुण्याची झालेली विखारी जाणीव, पुढे याच मानसिकतेत तारुण्याच्या जोरावर नाव कमावलेली धाडसी नृत्यांगना, प्रेक्षकांवर हुकुमत गाजवणारी कलासक्त स्त्री.त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि एकूणच कारकीर्दीचा आवाका ध्यानात घेता हे लिखाण तुटपुंजे असले तरी त्यांच्याबद्दलच्या ऐकीव कहाण्या मात्र विपुल आहेत.

भाऊ बापू (मांग) नारायण गावकरांचा तमाशा महाराष्ट्र गाजवत होता तेव्हाचा काळ! सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर या गावी भाऊ खुडेंची बायको शांताबाई गरोदर होती. त्या दिवशी तमाशाचा मुक्काम पंढरपूरला होता. ती आषाढी एकादशीची रात्र होती. रात्री भाऊंच्या तमाशाचा फड उभा राहिला आणि इकडे शांताबाईंच्या वेणा वाढू लागल्या. मध्यरात्रीच्या सुमारास शांताबाईंनी एका गोंडस मुलीला जन्म दिला. पंढरपूरच्या विठोबाच्या छायेत मुलगी झाली म्हणून भाऊ आणि शांताबाईंनी तिचं नाव विठा ठेवलं.पण तमाशाच्या फडाला आणि पहाटेच्या सूर्याला साक्षी ठेवून जन्माला येऊन विठानं जणू नेमकी वेळ साधली. कारण विठा नामक हे नक्षत्र पुढे तमाशा विश्वावर तेजाने तळपलं. भाऊ खुडेच्या या लेकीनं पुढं महाराष्ट्राला आपल्या तालावर नाचवलं. विठाबाई भाऊ नारायणगावकर या नावाने तमाशाला दिल्लीच्या तख्तातापर्यंत नेलं.

विठाबाईंचे वडील भाऊ खुडे आणि चुलत भाऊ बापू खुडे यांचा भाऊ-बापू (मांग) नारायणगावकर हा तमाशा अस्सल लोककलेचा नमुना तर होताच पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तमाशा हे या कलावंतांसाठी समाज सुधारणेचं एक माध्यम होतं. लहानपणापासूनच नृत्य आणि गायनाकडं विठाबाईंचा विशेष ओढा होता. घरी असताना तमाशातल्या लावण्या, गवळणी, भेदीक त्यांच्या कानावर आपसूक पडत होत्या. पण शाळेतही कवितेमध्ये विशेष रुची होती. त्यांचा हा कलेकडचा आत्यंतिक ओढा बघूनच वडिलांनी शिक्षणाची सक्ती केली नाही आणि वयाच्या चौथ्या - पाचव्या वर्षीच विठाबाईंची शाळा कायमची बंद झाली. आता त्या आपल्या वडिलांच्या तमाशाबरोबर भटकंती करू लागल्या. याच सुमारस मामा वरेरकर - आळतेकर आपल्या कलापथकातून एकांकिका आणि पथनाट्याच्या माध्यमातून समाजजागृती करत होते. भाऊ-बापूचा तमाशा पाहून ते खूपच प्रभावित झाले. भाऊ आणि बापू तमाशातून त्यांच्यासारखेच समाजप्रबोधन करत होते. त्यामुळे मामा वरेरकरांचा आणि भाऊ - बापूंचा विशेष स्नेह जुळला.

भाऊ-बापूच्या तमाशात आता अधून-मधून विठाबाई आपल्या कलेची चुणूक दाखवून जात होत्या. ही कला मामा वरेरकरांनी नेमकी हेरली आणि विठाबाईंना आपल्या कलापथकात पाठवून द्यायची विनंती भाऊंना केली. भाऊंनी ती तात्काळ मान्य केली आणि विठाबाई मामा वरेरकरांच्या कलापथकातून काम करू लागल्या. त्यामुळे त्यांच्या अनुभवाच्या आणि शिकण्याच्या कक्षा रुंदावल्या. देशाविषयी, समाजाविषयी एक भूमिका तयार झाली. तमाशात आत्मसात केलेल्या कलेला आणखी पैलू पडले. त्यात शास्त्रशुद्धपणा आला. आपल्या कलेत त्या आणखी निपुण झाल्या.

याच दरम्यान भाऊ-बापूंचा तमाशा कोळे या गावी मुक्कामाला होता. तिथं भाऊ अकेलकर यांनीही आपल्या तमाशाचा फड उभारला होता. दोन्ही फडांनी एकमेकांना आव्हान दिलं आणि त्या रात्री दोघांमध्ये ऋभेदीक' सुरू झाली. सवाल-जबाब सुरू झाले. कुणीच कुणीच कुणाला हार जात नव्हतं. पण अकेलकरांच्या नुकत्याच वयात आलेल्या मुलीने 'अशी कोणती रूपाची खाण तुझ्या गाठीला आहे', असा सवाल करत बापूंना निरुत्तर केलं. भाऊंना ही हार जिव्हारी लागली. या पराभवानं विठाबाईही पेटून उठल्या आणि लागलीच बाडबिस्तारा आवरून कराडच्या वाटेला लागल्या.

त्या रात्री पुन्हा एकदा दोन्ही तमाशात भेदीक जुंपली आणि ती जुगलबंदी जिंकून विठाबाईंनी आपल्या वडिलांना हरविल्याचा पुरेपूर बदला घेतला. त्या रात्री विठाबाईंचं बोर्डावर पाय ठेवणं ऐतिहासिक होतं. ती त्यांच्या पुढच्या देदिप्यमान प्रवासाची नांदी होती. त्या वेळी विठाबाई फक्त तेरा वर्षांच्या होत्या. दिवस जात होते तशी विठाबाईंची कला रसिकांना भुरळ घालत होती. नृत्यात आणि गायनात त्या खूप सरस होत्या. गवळणी, लावण्या, मराठी-हिंदी चित्रपटातली गीतं सुरेल आवाजात म्हणत असत. ढोलकीच्या तालावर नाचणार्या विठाबाईंना पाहणं हा एक अपूर्व आनंद असे. त्यांच्यामुळे तमाशाला एक वेगळंच वलय प्राप्त होत होतं.

तमाशातल्या कलावंतीणीचं आयुष्यही विठाबाईंच्या हळू-हळू अंगवळणी पडत होतं. तमाशातल्या बायकांची लग्न होत नाहीत हे त्यांना ठाऊक होतं. तमाशातल्या कलावंतांचं आयुष्यच खूप निराळं! बहुतेक पुरुष त्यांचं लग्न झालेलं असूनही त्यांच्या बायका-पोरांना गावी ठेवून तमाशातल्याच एखाद्या कलावंतीणीशी संधान बांधत. ती कलावंतीण जराशी थकली किंवा तिच्याशी बिनसलं की, ते तिला सोडून देत आणि दुसर्या कलावंतीणीबरोबर घरोबा सुरू करत. ती कलावंतीण मग दुसरा आधार शोधत असे. त्यांच्या संबंधातून जन्माला आलेली संतती फडावरच लहानाची मोठी होत असे. शाळेचं शिक्षण या मुलांपासून कोसो दूर असे. ही मुलं जरा कळती झाली की, फडावरच जुजबी कामं करत. फडावरच्या स्वैर वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होत असे. मुलींची अवस्था फारच वाईट असे. विठाबाईंनी याही परिस्थितीचा समर्थपणे सामना केला.

तमाशाचा फड विठाबाईनं पुरता काबीज केला. लोक निखळ विठाबाईंचा नाच पाहायला आणि त्यांचं गाणं ऐकायला येत असत. भाऊ-बापूंचा तमाशा आता नावापुरता त्यांचा उरला होता. गण, गवळण झाली की विठाबाई बोर्डावर यायच्या. त्यांनी बोर्डावर पाय ठेवला की, शिट्ट्या आणि टाळ्यांचा कल्लोळ व्हायचा. मग रसिकांकडून फर्माईशी सुरू व्हायच्या. विठाबाईंच्या पायातल्या घुंगरांनी, अंगातल्या चैतन्यानं, प्रत्येक अदेनं रसिकांना घायाळ केलं होतं.

भाऊ-बापूच्या तमाशातली गवळण, बतावणी, वगाचं सादरीकरण सगळंच अलातून असे. या वगांचे विषयही 'शिवप्रतापासारखे' ऐतिहासिक, 'सत्यवान सावित्री' सारखे धार्मिक तर कधी 'चंद्र-मोहन' किंवा 'मवाडचा कोळी' सारखे सामाजिक असत. त्यामुळे तमाशाला येणारा प्रेक्षकवर्ग अगदी शहरातल्या बुद्धिजीवीपासून खेड्यातील अडाणी माणसापर्यंत सर्व थरातला असे. साहित्याची आणि लोककलेची आवड असणार्या बहुतेकांनी भाऊ-बापूंचा तमाशा पाहिला होता. संगीत नाटक अकादमीच्या समितीवर असणार्या काही ज्येष्ठ कलावंतांनीही हा तमाशा पाहिला होता. त्यांनी भाऊ-बापूंच्या तमाशाची समितीकडे शिफारस केली. हा तमाशा कलेच्या माध्यमातून लोकशिक्षणाचा कसा प्रचार करतो याची माहिती दिली. त्यांच्या या शिफारसीमुळेच भाऊ-बापूंच्या तमाशाला तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. या वेळीही विठाबाई कार्यक्रमाच्या मुख्य आकर्षण ठरल्या. दिल्लीकरांकडून शाबसकी मिळवूनच त्या घरी परतल्या. लवकरच नाटक अकादमीच्या परीक्षक मंडळानं पुरस्कारासाठी भाऊ-बापूंच्या तमाशाची निवड केली आणि तमाशा क्षेत्रात राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारा तो पहिला तमाशा ठरला.

सरकार दरबारी असं कौतुक झाल्यावर मग विठाबाईंनी मागं वळून पाहिलं नाही. तमाशातले त्यांचे स्पर्धक आता खूप मागं पडले होते. तमाशा म्हणजे विठाबाई असं समीकरण रूढ झालं होतं. आपला जन्म केवळ कलेची सेवा करण्यासाठी झालाय अशीच त्यांची धारणा होती. याबाबतीत एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. या प्रसंगातून त्यांची आपल्या कलेकडं बघण्याची दृष्टी आणि तिच्यासाठी काहीही करण्याची पराकोटीची भावना दिसून येते.

१९६७ साली तमाशाचा मुक्काम शिखर शिंगणापूरला होता विठाबाई त्या वेळी गरोदर होत्या. दिवस भरत आले होते. पण विठाबाईंना उसंत नव्हती. अशाच अवस्थेत त्यांनी पायात चाळ बांधले आणि बोर्डावर आल्या. गवळणींबरोबर बेभान होऊन नाचल्या. पण बतावणी सुरू झाली आणि कळा असह्य झाल्याने विठाबाई ताबडतोब आपल्या राहुटीत आल्या. आता बाळंतवेणा सुरू झाल्या. तमाशा पाहायला आलेल्या एका म्हातारीनं आपलं दाईपण व्यवस्थित निभावलं आणि विठाबाईंना मोकळं केलं. त्यांना कमालीचा अशक्तपणा जाणवत होता. पण लोकांना वगनाट्याचा पुढचा भाग पाहायचा होता. विठाबाईंचं काम पाहायचं होतं. राहुटीत पडल्या-पडल्या विठाबाईंच्या कानावर हा गोंधळ गेला. ऋपब्लिक' ऐकत नाही हे पाहताच त्या उठल्या, चाळ पुन्हा पायात बांधले आणि पुन्हा बोर्डावर पाय ठेवला. आता आश्चर्य करण्याची वेळ रसिकांची होती. विठाबाईंनी रसिकांची इच्छा पूर्ण केली, कलेवरची अपार निष्ठा व्यक्त केली.

विठाबाईंची आपल्या कलेवरची निष्ठा ही अशी होती. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांनी अनेक माणसं जोडली. काही त्यांच्या वडिलांच्या काळापासून होती. त्यांच्या मदतीनं त्यांनी अनेक ठिकाणी आपली कला नेली. १९६२ मध्ये विठाबाईंच्या आयुष्यात आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली. विठाबाई आणि त्यांच्या सहकार्यांना लष्करातील जवानांची करमणूक करण्यासाठी नेफा सीमेवर जाण्याचं आमंत्रण मिळालं. विठाबाईंच्या कलेचा हा एक प्रकारे सन्मान होता. खरं तर त्या वेळी विठाबाईंची लेक मालती अवघी तीन महिन्यांची होती. पण आपलं कर्तव्य श्रेष्ठ मानून त्यांनी मुलांना घरच्यांच्या हवाली केलं आणि आपल्या फडाबरोबर नेफा सीमेवर गेल्या. सीमेवरच्या बर्फाळ आणि जंगलाच्या प्रदेशात त्या आनंदानं राहिल्या. रोज एका छावणीवरून दुसर्या छावणीवर जाणं, तिथे कला सादर करणं हे कष्टप्रद होतं. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या काळात त्यांना विश्रांतीची गरज होती, त्याच काळात ही दगदग त्या सोशीत होत्या.

कालांतराने विठाबाईंच्या वडिलांचं-भाऊ खुडेंचं- आणि चुलत भाऊ बापू खुडेंचं निधन झाल्यावर तमाशाची सगळी सूत्रं त्यांचा दुसरा चुलत भाऊ सावळाराम यानं हाती घेतली. पण त्याच्या काळात फडात हेवेदावे सुरू झाले. आर्थिक स्थितीही ढासळली. विठाबाई आणि सावळाराम यांच्यात वितुष्ट आलं. याचा परिणाम एवढाच झाला की, विठाबाई आपल्या मुलींसोबत भाऊ-बापूंच्या तमाशातून बाहेर पडल्या आणि त्यांनी विठा-भाऊ (मांग) नारायणगावकर असा स्वतंत्र फड सुरू केला. त्यांच्या तमाशाचा लौकिकही आता दिवसेंदिवस वाढत होता. त्यांच्या संपर्कात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातली मोठ-मोठी मंडळी येत होती. अशा रीतीने नारायणगावच्या गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या रसिकांच्या कानात विठाबाईंच्या पायातल्या चाळाचे बोल, गळ्यातले लावणीचे सूर निनादू लागले.


विठाबाईंची आर्थिक बाजूही भरभक्कम झाली होती. रसिकांनी त्यांच्यावर मुक्तहस्ते उधळलेल्या पैशामुळे नावलौकिकाबरोबरच चांगला पैसाही त्या गाठीला बांधत होत्या. पण जवळच्याच लोकांनी त्यांचा विश्वासघात केला.

पण विठाबाईंनी पुन्हा मुंबईचे जुने ठेकेदार प्रभाकर कामेरकर यांच्या मदतीनं नव्यानं फड सुरू केला. नव्यानं माणसं बांधली. या वेळी त्यांची मुलगी मालतीही त्यांच्या मदतीला होती. पण विठाबाई आयुष्यातल्या अनेक चढ-उतारांनी खचल्या होत्या. अधून-मधून त्यांना गोत्यात आणणार्या नातेवाईकांच्या कारवाया, थोरली मुलगी मंगला बनसोडे हिचं विभक्त होणं, खुद्द विठाबाईंच्या तमाशाच्या बसला झालेला अपघात या सर्व घटनांनी त्यांचं मनोधैर्य खचत होतंच पण त्या कर्जातही आणखी रुतत होत्या.

तसं त्यांच्या कलेनंही त्यांना भरभरून दिलं. त्यांनी केलेली रसिकसेवा आणि कलेची सेवा सर्वपरिचित होती. त्यामुळे त्यांच्या पडत्या काळातही केवळ त्यांच नाव ऐकून त्यांना मदत करणारे अनेक जण होते. यात महत्त्वपूर्ण उल्लेख करावा लागेल तो लोकसत्ताचे तत्कालीन संपादक माधव गडकरी, वृत्तनिवेदक प्रदीप भिडे आणि तमाशाचे अभ्यासक प्रकाश खांडगे यांचा. या तिघांनी वृत्तपत्रातून, दूरदर्शनवरून विठाबाईंची परिस्थिती लोकांसमोर मांडली आणि त्यांच्यासाठी मदतीचा ओघ सुरू झाला. दुर्गाबाई भागवतांनी १०,००० रु. ची मदत केली. यातूनच या तमाशा सम्राज्ञीचा सत्कार करण्याची कल्पना पुढे आली. आणिमुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या सभागृहात विठाबाईंचा हा सत्कार सोहळा दुर्गाबाई भागवतांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमामुळे विठाबाईंचे कलेवरील प्रेम आणि निष्ठा पुन्हा एकदा रसिकांपुढे आली.

विठाबाईंनी या पैशातून आपली जुनी देणी चुकती केली, गहाण पडलेल्या गाड्या सोडविल्या. इथून पुढे स्वतःच्या जिवावर फड चालवण्याची उमेद त्यांच्यात आता राहिली नव्हती. म्हणून आपला फड तिनं मुलीच्या फडात विलीन केला आणि स्वतः आपल्या वतनाच्या गावी म्हणजे नारायणगावला निघून गेल्या. पण माध्यमांच्या प्रसिद्धीमुळे त्यांचे नाव आता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात आदराने घेतले जात होते. त्यामुळे तमाशातून पूर्ण अंग काढून घेऊनही त्यांचे सत्कार समारंभ चालूच होते. याच काळात संगीत नाटक अकादमीच्या पुरस्कारासाठी विठाबाईंच्या तमाशाची दुसर्यांदा निवड झाली. त्यांना आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले. विठाबाईंना त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत पुरस्कार मिळत होते.

विठाबाईंच्या आयुष्याचा लेखाजोखा मांडताना त्यांचं कलेवरचं प्रेम, निष्ठा, त्यासाठी केलेवरचं प्रेम, निष्ठा, त्यासाठी केलाला त्याग, निभावून नेलेले प्रसंग पाहिले की, आवाक व्हायला होतं. त्याच वेळी तमाशा फडांवरील काही अपरिहार्यतांमुळे झालेली आयुष्याची दैना हा सुद्धा त्यांच्या आयुष्याचा एक भाग होता. पण विठाबाईंची कहाणी अनुभवताना लक्षात राहतं ते त्यांचं तमाशाच्या क्षेत्रातलं अलौकिक कर्तृत्व! गावकुसाबाहेरच्या या कलेला त्यांनी लोककलेचा दर्जा दिला. विठाबाई हे एक अजब रसायन होतं. त्यांची कला, निष्ठा, त्यांचं आयुष्य, त्यांचं दुःख, त्यांचा बहराचा काळ, या काळात भोगलेलं ऐश्वर्य, झालेली दुर्दैवी फसवणूक हे सगळंच विलक्षण होतं. समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीनुसार तमाशाच्या फडावर, त्यातील कलावंतीणींवर पुरुषांचेच वर्चस्व असते. ऋस्त्री' आपली कला सादर करते, पुरुषांकडून पैसा उधळला जातो, परत त्या पैशावर पुन्हा पुरुषच डल्ला मारतात. याही परिस्थितीत तमाशा फडाशी जोडलेल्या सर्व अपरिहार्यतांचा स्वीकार करून विठाबाईंनी कला जपली, लोकांना आनंद दिला. ही गोष्ट विठाबाईंची महानता अधोरेखित करते. विठाबाई भाऊ (मांग) नारायणगावकर यांचे निधन १५ जानेवारी २००२ रोजी झाले.



# माळशिरसचे पक्षी व वन्यजीव वैभव

डॉ. अरविंद कुंभार
अकलूज
९८२२१२४१९१



**पक्ष्यांच्या अधिवासाबद्दल सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेने अग्रेसर असलेले माळशिरस तालुका पक्षी वैविध्य व अन्य वन्यजीवांबाबतीत समृद्ध आहे. माळशिरस तालुक्याचा शिरोभाग माळरान, दगड-खडकाळ भागाने व्यापलेला असल्यामुळे या तालुक्याला माळशिरस असे समर्पक नाव दिले आहे. सोलापूर जिल्ह्यातील हा तालुका जिल्ह्याच्या पश्चिमेकडे, सांगली व सातारा व उत्तरेकडे पुणे जिल्ह्यांना जोडून आहे. तालुक्यात वीर-भाटघर व उजनी धरणातून खळाळणाऱ्या पाण्यामुळे तालुक्याचा पश्चिम भाग वगळता बहुतांश क्षेत्र बारमाही बागायती पिकांनी बहरून असतो. दरवर्षी बरसणाऱ्या बेताच्या पावसामुळे तालुका अवर्षणप्रवण भागात मोडत असला तरी खूप वर्षांपूर्वी सहकार चळवळीच्या माध्यमातून तालुक्यात पाण्याची पाटांचे जाळे पसरलेले आहे. त्यामुळे तालुक्याचा बराच भूभाग हिरव्या पिकांनी व वनसंपदेनी झाकोळलेला आहे. तालुक्यात घनदाट जंगल नसले तरी बहुतांशी क्षेत्र ऊसाने आच्छादित झालेले आहे. फळबागांची शेती फुलली आहेत; परिणामी विविध कीटक, पक्षी व वन्यजीवांना पोषक वातावरण तालुक्याला लाभले आहे. त्यामुळे तालुक्याला पक्षी तसेच वन्यप्राण्यांना समृद्ध प्रदेश म्हणून ओळखले जाते.**

तालुक्यात चार साखर कारखाने असून कारखाना परिसरात लावलेले विविध भारतीय मूळ वृक्षराजी पक्ष्यांसाठी सारंगगार ठरले आहेत. माळीनगर व सदाशिवनगर येथील साखर कारखाना परिसरातील वृक्षसंपदेच्या गर्दीत दाटीवाटीने वर्षानुवर्षे स्थानिक व स्थलांतरित पक्षी वर्षभर रात्रीच्या विसाव्याला असतात. सदाशिवनगर येथील शंकर सहकारी साखर कारखाना परिसरातही गेली कित्येक वर्षांपासून विविध पक्ष्यांची किलबिल ऐकायला मिळते. माळीनगरच्या साखर कारखाना परिसरात सुमारे सत्तर वर्षांपूर्वी लावलेले मोठाले वृक्ष आजमितीला मोठ्या दिमाखाने हजारोंच्या संख्येच्या पक्ष्यांसाठी वसतीस्थान बनले आहेत. गायबगळे, राखीबगळे, पाणकावळे, पोपट, भारतीय साळुंकी, चमचे चोच इत्यादी पक्षी शेकडोंच्या कळपाने दिवसभरातील उदरनिर्वाह करून मुक्कामाला या ठिकाणी झाडांवर स्थान निश्चिती करून रात्रभर झोपी जातात. हिवाळ्यात युरोपमधून स्थलांतर करून येणारे भोरड्या (गुलाबी मैना) हे पक्षी लक्षावधी संख्येने या ठिकाणी मुक्काम करतात.

तालुक्याला पुणे जिल्ह्या अलग करणारे सुमारे ५० किलोमीटर नीरा नदी काठ व माढा तालुक्याला विलग करणारे सुमारे ३० किलोमीटर भीमा नदीकाठ लाभलेली आहे. या दोन्ही नदी पात्रात व काठावर अनेक स्थानिक व स्थलांतरित जलपक्षी वर्षभर नजरेस पडतात. तसेच नदीच्या काठावरील गचपणीत सायाळ (साळिंदर) व खवले मांजर असे वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीव दिसून येतात. तालुक्यातील लवंग गावाच्या शिवारातील ऐतिहासिक वज्राई मंदिराजवळच्या नीरा नदीच्या खडकाळ पात्रात नैसर्गिकरित्या तयार झालेल्या दगडाच्या कपारीत शेकडो पाकोळी पक्ष्यांनी चिखल वापरून गोवऱ्या सारखे घरटी लिंपून नवीन पिढीला जन्म घालतानाचे काम वर्षानुवर्षे चालत आहे.

तालुक्याचा पश्चिमभाग डोंगराळ असून बहुतांश क्षेत्रा गवताळ कुरणाने व्यापला आहे. या भागातील जिल्ह्यातील अती उंच शिखर म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुळकाई मंदिर परिसर विविध शिकारी पक्षी व वन्यजीवांना नंदनवन ठरले आहे. माळरानाचे वैभवाचे प्रतीक असलेले घारींपैकी कापशी घार, काळी घार (चचाण), ब्राह्मणी घार, गरुडांपैकी काळा गरूड, पिंगट गरुड व पांगूळ गरुड, ससाण्यातील बहिरी ससाणा व नारझिनट ससाणे, सरडा बाज, शिक्रा व खाटिक हे शिकारी पक्षी पावसाळा व हिवाळ्यात सावज टिपण्यासाठी आकाशात घिरट्या घालताना आढळतात. या भागातील माळावरील विशाल गवताळ प्रदेशात व कपारीत विविध साप, घोरपड, सरडे, साळिंदर, मुंगूस, खवले मांजर, कोल्हे, खोकड, लांडगे, तरस हे अनेक वन्यप्राणी वावरत पर्यावरणातील अन्नसाखळी शाबूत ठेवले आहेत. अन्नसाखळीत मुख्य घटक असलेले वटवाघळे तालुक्यातील रस्त्यांच्या कडेला जुन्या वृक्षांवर मोठ्या समूहाने उलटे टांगून लोंबकळतानाचे दृश्य सर्रास पाहायला मिळत असे; परंतू विकासाच्या सबबीखाली या झाडांची कत्तल केल्यामुळे या निशाचर वटवाघळांची संख्या घटली आहे.

तालुक्यातील निमगाव (म), फोंडशिरस, उघडेवाडी, फडतरी, पानीव- गिरझणी, कुसमोड या गावांच्या शिवारात मानवनिर्मित जुने तलाव आहेत. या सर्वच जलस्थानांवर वर्षभर स्थानिक पक्ष्यांबरोबर स्थलांतरित पक्षी गर्दी करून वावरत असतात. तालुक्यात २०० हून अधिक प्रकारचे पक्ष्यांची नोंद डॉ. निनाद शहा, डॉ. अरविंद कुंभार या ज्येष्ठ पक्षी अभ्यासकांच्या मदतीने, ऋतुराज कुंभार, दिग्विजय देशमुख, डॉ. विधिन कांबळे, निरंजन मोरे,अश्विनी हेगडे, वृषाली कुंभार अश्विनी बाबर, अतुल जोशी, प्रकाश धाईंजे, अभय जोशी आदी पक्षी निरीक्षकांनी नोंद केली आहे. २००७ नंतर पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरलेले सयाजीराजे पार्क नव्याने पक्षी धाम म्हणून नावारूपाला आले आहे. गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी मानव निर्मित तलावाकाठी उभे असलेल्या मोठ्या वृक्षांवर चित्रबलाक (रंगीत करकोचे) हे शेकडोंच्या जोडीने आपल्या पिल्लावळांना जन्म घालण्यासाठी 'मेटर्निटी होम' साकारत आहेत. मुबलक पाणी व खाद्य, पक्ष्यांच्या अधिवासासाठी सुरक्षित ठिकाणं व झाडाझुडुपांचे अस्तित्व या कारणांमुळे पार्कला भेटी देणाऱ्या पर्यटकांना वर्षभर या ठिकाणी विविध पक्षी आपल्या मनमोहक छबीने भुरळ घालतात. अकलूज येथील कै. शंकरराव मोहिते- पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील वखार व मोठ्या झाडांवर शेकडो भारतीय पोपट गेली कित्येक वर्षे वावरताना आढळतात. तालुक्यातील जैववैविध्य टिकून ठेवण्यासाठी त्यांच्या अधिवासातील मानवी शिरकाव, वृक्षतोड, शिकारी इत्यादी अहितकारक गोष्टींना आळा घातला पाहिजे.





आमचे दैवत | प्रेरणास्थान | प्रेरणास्थान



श्री. विजयसिंह मोहिते-पाटील माजी उपमुख्यमंत्री | खा. धैर्यशिल मोहिते-पाटील | आ. रणजितसिंह मोहिते-पाटील

दैनिक सोलापूर तरूण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

श्री. भिमराव हनुमंत रेडे-पाटील
उपनगराध्यक्ष
महाळुंग-श्रीपूर नगर पंचायत



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



विठ्ठल कुंभार
क्रीडा शिक्षक
नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल,नीलमनगर, एमआयडीसी, सोलापूर



दैनिक सोलापूर तरूण भारत





दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

मा. आमदार दिपकआबा साळुंखे पाटील प्रेमी, सांगोला तालुका



दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

## फॅबटेक टेक्निकल कॅम्पस

Approved by AICTE, New Delhi | Approved by PCI, New Delhi | Approved by DTE (M.S.)
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere. | MSBTE Mumbai.
NAAC Accrediated, ISO 9001:2015 Certified Institute

गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच फॅबटेक एज्युकेशन सोसायटीचे ध्येय




आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेश सुरू

- फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला (स्वायत्तता दर्जा प्राप्त)
- फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, पॉलिटेक्निक (डिप्लोमा) सांगोला
- फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला (डी. फार्म अँड बी. फार्म)
- फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज, सांगोला (सी. बी. एस. ई. बोर्ड स्कूल)

8408888657 www.fabtecheducation.com
Fabtech Education Society, Pandharpur Road, Sangola, 413 307





ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे
अध्यक्ष जगन्नाथ शिंदे
व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे
सचिव शरद नाईक
यांच्यातर्फे
दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिरासाठी संपर्क ९४२३३३७३४६



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



हरीष अन्नलदास
आंतरराष्ट्रीय डायव्हिंग प्रशिक्षक




तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

## मॉडेल क्रिकेट अकादमी

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, सोलापूर

प्रशिक्षक



रोहित जाधव | सत्यजित जाधव | अक्षय हावळे

प्रशिक्षणाची वेळ
सकाळी ७ ते ९
सायंकाळी ४.३० ते ६.३०

संपर्क : 9923602593 / 9766000077



४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## मास्टर्स क्रिकेट अकॅडमी, सोलापूर

पाटील पेट्रोल पंपच्या बाजूला, प्रियंका चौक, भवानी पेठ सोलापूर.

– प्रशिक्षक –
राजेश येमुल, दत्तात्रय बडगू, राजवर्धन जिल्ला
– प्रशिक्षणाची वेळ –
सकाळी 6.30 ते 8.30 व दुपारी 4.30 ते 6.30 पर्यंत
संपर्क : 8275207738/7058477340



सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

आस्था रोटी बँकेतर्फे दररोज सिव्हिल हॉस्पिटलमध्ये व निराधार महिलेंना मोफत अन्नदान केले जाते.

आस्था फौंडेशन, सोलापूर
आस्था रोटी बँक

आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष
विजय छंचुरे

आस्था रोटी बँकेचे सल्लागार
राजू हौशेट्टी



दै.तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी खेळ प्रशिक्षण केंद्र, सोलापूर



गुरुकुल मध्ये शिकवले जाणारे प्रकार

* लाठी यद्ध * लाठी काठी * तलवारबाजी * दांडपट्टा * फरीगदगा * उर्मी * फास * भाला * कराटे * योंगमुडो (कोरियन मार्शल आर्ट)

शाखा १: राजर्षी शाहू प्रशाला, जुना विडी घरकुल, सोलापूर.
शाखा २: एच ग्रुप जुना विडी घरकुल, सोलापूर
शाखा ३: नवीन विडी घरकुल, सोलापूर

विवेक मिस्कीन क्रीडा शिक्षक
विवेकानंद पब्लिक स्कूल, सोलापूर. मोबाईल: ९५०३०३९६२७



समृध्दी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ अंतर्गत

## समृध्दी कला मंचच्या

वतीने हार्दिक शुभेच्छा!



चंद्रकांत होळकर | रमेश बसाटे | प्रशांत बडवे | गोवर्धन कमटम | मल्हारी बनसोडे | सुमित फुलमामडी | किरण लोंढे

### समृध्दी कला मंच पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य



कृष्णकांत चव्हाण — अध्यक्ष
संजय सावंत — प्रमुख कार्यवाह

उपाध्यक्ष : मल्हारी बनसोडे (प्रशासन), सुमित फुलमामडी, किरण लोंढे (उपक्रम)

सहकार्यवाह : हिरालाल धुळम (प्रशासन), पुंडलिक कलखांबकर, श्रीमंत कोळी (उपक्रम).

कार्यकारिणी सदस्य: मल्लिनाथ निंबर्गी, रेणुका बुधाराम, डॉ. माधुरी भोसले, अर्चना कलखांबकर, मल्लिकार्जुन सोमेश्वर, जितेश कुलकर्णी, अनिल खरटमल, बालाजी चव्हाण

विशेष निमंत्रित सदस्य: प्रशांत बडवे, गोवर्धन कमटम, बसवराज मठपती, अरविंद मोटे.

सल्लागार: चंद्रकांत होळकर, रमेश बसाटे.



दै.तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

श्रीरंग दिनकर बनसोडे
राष्ट्रीय खो-खो पंच

अध्यक्ष : कास्ट्राईब शिक्षक संघटना दक्षिण सोलापूर शाखा
खजिनदार : सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन
उपाध्यक्ष : रेणुकानगरी गृहनिर्माण संस्था
खजिनदार : ब्रम्हा गॅलक्सी, जुळे सोलापूर
संस्थापक अध्यक्ष : बॉलिवूड सिंगिंग ग्रुप
शिक्षक : जि.प प्राथमिक शाळा इंगळगी (ता. दक्षिण सोलापूर)







माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे संचलित

## दमाणी विद्या मंदिर, सोलापूर

१९४/१, चंडक प्रांगण, बुधवार पेठ, सोलापूर

दै. तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

सर्व संस्थाचालक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी



तरुण भारत ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक :

## ग्रीन स्टार स्पोर्ट्स क्लब, सोलापूर

सर्व पदाधिकारी, सदस्य व खेळाडू

सोलापूर तरुण भारत ४१ व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा



## प्रमोद कुनगुलवार

राष्ट्रीय हँडबॉल खेळाडू व क्रीडा शिक्षक

दयानंद काशीनाथ आसावा प्रशाला, सोलापूर




राजकुमार सुरवसे
अध्यक्ष

प्रमोद काटे
सचिव

दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

## सोलापूर जिल्हा शरीरसौष्ठव संघटना



जगज्ज्योती महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समिती
अध्यक्ष- डॉ.बसवराज बगले

तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

## डॉ.बसवराज बगले

- अध्यक्ष - महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समिती.
- राज्य समन्वयक - सकल लिंगायत महासमिती.
- राज्य समन्वयक - लिंगायत संघर्ष समिती महाराष्ट्र.

शुभेच्छुक

## डॉ.बसवराज बगले मित्र मंडळ
## जुळे सोलापूर प्राधिकरण कृती समिती

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर

ता. माळशिरस, जि. सोलापूर मोबाईल नं. ९९२२९९३७९०, ९९२२९९३७९४
फोन नं. (०२१८५) २५११३३, २५१२०२, २५१२०३, फॅक्स (०२१८५)२५१०८६
E-mail : saswadmali@yahoo.com saswadmalisugar@gmail.com
Website : sasawadmalisugar.in

दैनिक तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सन १९३२ साली स्थापन झालेल्या शेतकऱ्यांचा व शेतकऱ्यांनी चालविलेला भारतातील पहिला साखर कारखाना, शुभ्र व दाणेदार साखरेबरोबरच उच्च प्रतीचे ग्रेन बेस्डव मोलॅसेस बेस्ड स्पिरीटचे विक्रमी उत्पादन करणारी खाजगी क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी -

-: प्रकल्प :-

| | |
|---|---|
| साखर कारखाना | क्षमता ४५०० टी.सी.डी. |
| मोलॅसेस बेस्ड डिस्टिलरी (आर.एस.) | क्षमता ४५००० लि. प्रतिदिन |
| इथेनॉल प्लँट | क्षमता ५०००० लि. प्रतिदिन |
| ग्रेन बेस्ड डिस्टिलरी (इ.एन.ए) | क्षमता ३०००० लि. प्रतिदिन |
| को-जनरेशन | क्षमता १४.८ मे. वॅट |
| हॉटेल सेंट्रल पार्क, पुणे | ४२ रुम्स, मध्यवर्ती ठिकाणी पार्किंगसह |

गणेश ज्ञा. इनामके, होलटाईम डायरेक्टर
परेश दि. राऊत, होलटाईम डायरेक्टर
निखिल वि. कुदळे, व्हाईस-चेअरमन
राजेंद्र गो. गिरमे, चेअरमन

-: संचालक मंडळ :-

सतिश दि. गिरमे, नंदकुमार ज. गिरमे, मोहन रा. लांडे, राहुल कृ. गिरमे
अशोक शं. गिरमे, विशाल अ. जाधव, यश गौ. बोरावके, निळकंठ रा. भोंगळे
राजीव ज. देवकर, इंनडिपेंडंट डायरेक्टर
सौ. सविता अ. पांढरे, महिला इंनडिपेंडंट डायरेक्टर

पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी प्रसन्न, शांत, आरामदायक वातावरणात असलेले व नुकतेच अत्याधुनिक सोयीसुविधांनी नुतनीकरण केलेले आमचे हॉटेल आपल्या सेवेत रूजु झाले आहे.

## हॉटेल सेंट्रल पार्क

१२६५, आपटे रोड, क्रॉस लेन, डेक्कन जिमखाना, संभाजी पार्कजवळ, पुणे - ४११००४
मो.नं. ९९२२४३१३३३ फोन नं. (०२०) २५५३१७८०, २५५३२८९१
email : hotelcentralpark@gmail.com

तसेच

विवाह, साखरपुडा, वाढदिवस, बारसे स्नेहसंमेलन, मेळावे आदि विविध कार्यक्रमासाठी

## सौभाग्य मंगल कार्यालय

पेट्रोलपंपा समोर, माळीनगर
(संपर्क : मोबाईल नं. ९९२२९९३८१६)
व्यवस्थापक - दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.,

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

mitvpu.ac.in

MIT Vishwaprayag University

## स्वप्नं मोठी आहेत... मग शिक्षणही तसच हवं
## एमआयटी विश्वप्रयाग - आधुनिकतेसह मूल्यांचा वारसा जपणारे विद्यापीठ

**School of Computing**

B.Tech
- Computer Science Engineering
- Computer Science Engineering (AI & ML)
- Electronics and Communication Engineering
- Information Technology (Lateral Entry)

BCA | MCA

AICTE Approved

**School of Business**

BBA
- Business Analytics
- FinTech
- Marketing Management
- CMA (Cost & Management Accountancy)

MBA
- Business Analytics
- FinTech
- Marketing with Digital Transformation

AICTE Approved

**School of Pharmacy**

B. Pharm
- Pharmacovigilance
- Regulatory Affairs
- Medical Coding
- AI in Healthcare

PCI Approved

**School of Design**

B.Des
- Product Design
- Communication Design
- User Experience Design

AICTE Approved



एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या 'बहुमुखी' विकासाचे केंद्र आहे, जिथे विद्यार्थी तांत्रिक ज्ञानासोबत डिझाईन विचारसरणी आणि आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचा समावेश असलेले शिक्षण घेऊ शकतात. उद्योगाभिमुख शिक्षण, शिकण्याचे स्वातंत्र्य आणि भविष्यातील संधीसाठी सर्वांगीण तयारी - हेच आमचे ध्येय.

5 UNIVERSITIES | 63,000+ STUDENTS | 4,000+ FACULTIES | 80+ INSTITUTIONS | 1,00,000+ ALUMNI

SCAN TO APPLY

ADMISSIONS OPEN 2025-26 | 8496 849 849 admissions@mitvpu.ac.in

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगाव, सोलापूर – ४१३२५५




**सांगोल्यासारख्या कायम दुष्काळी भागातील शेतकरी, कष्टकरी व शेतमजुरांच्या मुलांना व विशेषता मुलींना कमी खर्चात तंत्र शिक्षण घेता यावे यासाठी सांगोला तालुक्याचे ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड यांनी अद्यावत व सर्व सोयींनीयुक्त असे रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज सन-२००९ साली उभे करून तंत्रज्ञानाची दारे सर्व सामान्यांच्या मुलांना खुली करून दिली. कॉलेजच्या स्थापनेपासून आजपर्यंत ४००० हून अधिक विद्यार्थी कुशल अभियंते व उद्योजक होऊन बाहेर पडून समाज व राष्ट्र उभारणीमध्ये आपले योगदान देत आहेत. भाऊंनी निर्माण केलेल्या या शैक्षणिक संस्थेचा फायदा राज्यातील विद्यार्थ्यांना होत असून समाजातील तळागाळातील वंचित बहुजन विद्यार्थ्यांना रोजगार व नोकरी मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.**






# सांगोला तालुक्यातील तंत्रशिक्षणाचे जनक : बाबुराव गायकवाड




दिपक भाकरे

सांगोला

९४२१०७४६३०


भाऊंनी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजची भव्य इमारत १७ एकरच्या कॅम्पसमध्ये सर्व सोईनींयुक्त उभी करून मोठ्या शहरातील महाविद्यालयामध्ये असणा-या सुविधा सांगोल्या सारख्या ग्रामीण भागामध्ये निर्माण करून दिल्या आहेत. विद्यार्थी स्पर्धेच्या युगात कुठेही कमी पडणार नाही याची काळजी घेतली आहे. शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग , सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्टॉनिक्स न्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग हे अभ्यासकम चालू केलेले आहेत. या कॉलेजमध्ये सर्व सोयींनीयुक्त भव्य व सुसज्ज असे वर्कशॉप, अत्याधुनिक लेंग्वेज लॅब, आधुनिक संगणक लॅब सोबत १०० एमबीपीएस लिजलाईनसह २४ तास इंटरनेट सेवा, आधुनिक व सुसज्ज लॅबोरेटरीज, पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके यांनी सुसज्ज ग्रंथालय व डिजीटल लायब्ररी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, कमवा व शिका योजना, कॉलेजमधील मुला-मुलींच्या राहण्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे व भोजनाची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. कॅंटींग व पिण्याच्या पाण्यासाठी जलशुध्दीकरण प्रकल्प उभा करून विद्यार्थ्यांना शुद्ध पाण्याची सोय उपलब्ध केली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष दिले जाते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे दरवर्षी कॉलेजचा शैक्षणिक दर्जा विशेष समितीतर्फे प्रत्यक्ष पाहणी करून दिला जातो. त्यामध्ये शिवाजी पॉलिटेक्निकने आपला उत्कृष्ट दर्जा मिळवून ग्रामीण भागातही दर्जेदार कॉलेज असू शकते यावर शिक्कामोर्तब केला आहे.

भाऊंच्या कुशल मार्गदर्शनाखाली या कॉलेजमधील विद्यार्थी पदविकेच्या अंतिम वर्षात असतानाच देश विदेशातील नामंवत कंपन्या जसेकी जॉन डिअर, टाटा मोर्टस, बजाज ऑटो, भारत फोर्ज, जीई एरोस्पेस, टीव्हीएस लुकास, स्पाईसर इंडीया, लक्ष्मी इंजिनिअरींग सर्व्हिसेस, शिर्के कंन्स्ट्रक्शन, कोलब्रो इंडिया, महिंद्रा, पंधे ग्रुप, किर्लो स्कर अशा वेगवेळ्या कंपनीमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. कॉलेजचे अनेक विद्यार्थी उद्योग क्षेत्रामध्ये आपले योगदान देत आहेत. अनेक विद्यार्थी स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून अधिकारी होऊन देश सेवा करीत आहेत.

कॉलेज क्रीडा स्पर्धेतही नेहमी आघाडीवर असून विभागीय व अंतर विभागीय स्पर्धेत खो-खो, कबड्डी, क्रिकेट, वेटलिफटिंग, बेंड मिंटन, कॅरम, चेस, बास्केट बॉल, व्हॉलीबॅल, कुस्ती, अथलेटिक्स १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर धावणे, ट्रिपल जंप, हाय जंप, लॅग जंप, भाला फेक, गोळा फेक, थाली फेक इत्यादी स्पर्धेमध्ये उज्वल यश मिळवण्याची परंपरा कायम ठेवत आले आहे.

दर्जेदार तंत्रशिक्षण देण्याबरोबरच भाऊंनी सामाजिक भान ठेवत अनेक समाज उपयोगी उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबवून सामाजिक बांधीलकी जपली आहे. प्रत्येक वर्षी कॉलेजच्या माध्यमातून दोनदा रक्तदान शिबिराचे आयोजन करून गरजू रूग्णांची मदत केली जाते. संस्थेने कोविड साथीच्या काळात तालुक्यातील विविध कोविड केंद्रातील रुग्णांना पौष्टिक आहाराचे वाटप केले. कॉलेज प्रत्येक वर्षी माजी विद्यार्थी संघटेनेच्या माध्यमातून विविध शाळांना शैक्षणिक साहित्य देऊन मदत करत आले आहे. एनएसएस च्या माध्यमातून गाव स्वच्छता केली जाते व व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मुलन, महिला सक्षमीकरण या विषयावर जनजागृती करून लोकांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियान, आयुष्यमान भारत कार्ड व उन्नत भारत यासारख्या केंद्र व राज्य सरकारच्या अभियानामध्ये सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधीलकी जोपासली आहे.

संस्थेच्या व कॉलेजच्या कार्याची दखल घेऊन शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल संस्थेस लायन्स क्लबचा अवॉर्ड प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य शालेय कृती समितीकडुन सर्वोत्कृष्ट सर्जनशील अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. संस्थेने सांगोला येथे संपन्न झालेले राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन पार पाडण्यासाठी सक्रिय योगदान दिले आहे.

सांगोल्याच्या शिक्षण, समाजकारण, कृषी, सहकार, अर्थकारण व राजकारण या सर्वच क्षेत्रात बाबुरावजी गायकवाड ऊर्फ भाऊ यांचे योगदान उल्लेखनीय आहे. सांगोल्या सारख्या ग्रामीण भागामध्ये शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजची स्थापना करून सर्वप्रथम तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाची दारे खुली करून सांगोला तालुक्यात तंत्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे श्रेय बाबुराव गायकवाड यांनाच जाते. बाबुराव गायकवाड व सर्व संचालक मंडळ यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली कॉलेज आपली उज्वल निकालाची परंपरा, प्लेसमेंट, शिस्त, संस्कार व अनुभवी स्टाफ यामुळे केवळ जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण राज्यात एक उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणुन नावारूपास येत आहे.



# दीनांची माऊली... बहुजणांनी अनुभवली




सिध्देश्वर झाडबुके

नाझरे, ता. सांगोला.

९९७५०३१०६५


श्री.श्री.१०८ गुरूनिर्वाण रूद्र पशुपती कोळेकर महास्वामीजी षटस्थल-ब्रह्मी श्री.श्री.१०८ गुरूनिर्वाण रूद्र पशुपती कोळेकर महास्वामीजी कोळे, ता.सांगोला गादीचे ३० वे मठाधिपती होते. तसेच महाराष्ट्रातील साडेतिनशेहून अधिक मठाचे कामकाज पाहत होते. भक्तांच्या हाकेला ओ देणारे, दक्षिणावर भर न देणारे, तंतोतंत वेळ पाळणारे, शांत, संयमी, अभ्यासू, निगर्वी, निराभिमानी, भक्तांची आस्थेवाईकपणे चौकशी करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असे आगळे वेगळे महाराज त्यांनी जनम नसात प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. गरीबातल्या गरीबानेही पाद्यपुजेसाठी घरी बोलावले तरीही महाराज त्यांचा मान राखत. यावेळी पाकीटात किती रक्कम घालता ? किंवा कमंडलूमध्ये किती दक्षिणा टाकता ? याकडे महाराजांनी कधीही लक्ष दिले नाही. आटपाडी, जवळे, सोनंद, हातीद, भोसे ता.मंगळवेढा इत्यादी मठामध्ये महिन्यातून एकदा आशिर्वचन होत असे. तसेच नाझरे येथील वीरभद्र मंदिरात दर अमावास्येला महाराजांचे आशिर्वचन ठरलेले असे. यावेळी अन्नदाते महाप्रसाद देत असत. प्रवासाचा कंटाळा म्हणून त्यांना आजिबात नव्हता. मुंबई, लातूर किंवा कोठेही गेले तरी परत कोळे किंवा निमसोड मुक्कामी येत. प्रकृतीची तमा त्यांनी कधीही बाळगली नाही. भक्तांच्या हिताची सतत त्यांनी काळजी घेतली.

आषाढ शुक्ल पौर्णिमा म्हणजे गुरू पौर्णिमा उत्सव कोळे मठामध्ये दरवर्षी मोठया भक्तीभावाने होत असतो. हजारोंना दीक्षा दिली जात असे. वीरशैव लिंगायत बरोबर धनगर, मराठा, होलार इत्यादी समाजातील अनेकांना महाराजांनी दीक्षा देवुन सन्मार्गाला लावले आहे. कोळे येथील धनगर समाज तर महाराजांना आमच्या गावचा देवच आहे असे मानत. कित्येकांनी दीक्षा घेऊन मांसाहार वर्ज्य करून मद्यपानाला सोडचिठ्ठी दिली आहे. गुरूपौर्णिमेच्या अन्नदान महाप्रसादाचे पुढील चाळीस वर्षापर्यंतचे बुकींग झाले आहे. यावरून महाराजांवरील भक्तांची दृढ श्रध्दा लक्षात येते. अनेकांची लग्ने जमवणे, तोडफोड-मोडीचे संसार पुन्हा तडजोड करायला लावून संसार थाटामाटात सुरू केल्याचीही उदाहरणे आहेत. श्रावण महिन्यातील सोमवार, महाशिवरात्र इत्यादीमध्ये तर शिवमय वातावरण निर्मिती महाराज करत असत. अनुष्ठान, नामजप, परमरहस्य-शिवलिलामृत-सिध्दांतशिखामणी इत्यादी ग्रंथाचे वाचन केले जात होते. गणेशोत्सवामध्ये-नवरात्रौत्सवामध्ये गावोगावच्या मंडळाच्या विनंती नुसार तेथे हजेरी लावून आशिर्वचनात चांगले वागण्याचा उपदेश करत.

कोळे ते शिखर शिंगणापूर पायी दिंडी महाराजांनी सुरू केली. त्यामध्ये ३ ते ४ हजार भक्तगण सामील होतात. वाटेत अन्नदाते खूप भेटतात. नामस्मरणाच्या गजरात शेटफळे, आटपाडी, दिघंची, राजेवाडी, म्हसवड, मोही, मार्डी मार्गे शिंगणापूरला दशमी दिवशी दिंडी पोहचत असे. सुरूवातीच्या काळात महाराज ताड-ताड झपाझप पाऊले टाकत दिंडी बरोबर असत. नंतर तट्टया असलेल्या सजवलेल्या बैलगाडीत बसू लागले. प्रकृती साथ देईनासी झाल्यानंतर कारगाडीत बसून येऊ लागले. लहान मुले, वयस्कर, आजारी व्यक्ती इत्यादींना चालणे होते का ते लक्षपुर्वक पाहत. महाराजांचे अवघ्या ६४ व्या वर्षी शिवैक्य होणे भक्तांसाठी फारच दुर्दैवी ठरले आहे. पण वास्तवाला पर्यायच नसतो. महाराजांच्या जीवात्म्यास चिरशांती लाभण्यासाठी व भक्तांना त्यांचा विसर न पडण्यासाठी तसेच धर्माचा प्रसार असाच होत राहण्यासाठी शिवचरणी नम्र प्रार्थना !




# अकलूजचे शिवरत्न नॉलेज सिटी

## व्यवसायाभिमुख उच्च शिक्षणाचे ध्येय पूर्ण करणाऱ्यांना वरदान

**शिक्षणक्षेत्रात आधुनिकतेच्या बदलानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवस्था पुरविण्यात अग्रेसर असलेली शैक्षणिक संस्था म्हणजे शंकरनगर -अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्था व श्री शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्ट होय! सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात सहकाराच्या बीज पेरणी बरोबर कै. शंकरराव मोहिते पाटील यांनी शिक्षणाचं रोपटे ही लावले. अकलूज पंचक्रोशीत विविध शिक्षण संस्था क्रियाशील असून तालुक्यातील जनता साक्षर बनली आहे.**




डॉ. अरविंद कुंभार

अकलूज

९८२२१२४१९१


१९७७ साली शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमातून शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट हे नावारूपाला आलेली संस्था आज बृहदाकार घेऊन अनेक शाखांमधून कार्यरत आहेत. या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून व्यवसायाभिमुख उच्च शिक्षणा देण्यासाठी २०१० साली अकलूज - शंकरनगर येथे शिवरत्न नॉलेज सिटीची स्थापना करण्यात आली. १९९९ साली नावारूपास आलेल्लया शिवरत्न नॉलेज सिटी या निसर्गरम्य परिसरात शिवरत्न शिक्षण संस्थे मार्फत विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ंड मेडिकल रिसर्च व शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज हे उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय चालविले जातात. . याच ठिकाणी शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टच्या वतीने ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कंप्युटर टेक्नॉलॉजी हे पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय कार्यान्वित आहेत.

समाजातील आरोग्य आणि स्वास्थता संभाळून उत्तम आरोग्यासाठी 'हीलिंग हँड्स' म्हणून उदयास येणाऱ्या युवक युवतींना रोजगार मिळवून देण्यासाठी विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ंड रिसर्च इन्स्टिट्यूट या शाखेने आपला ठसा उमटवला आहे. नर्सिंग कॉलेज मध्ये एम.एस्सी नर्सिंग, बी. एस्सी. नर्सिंग, जनरल नर्सिंग मिडवायफरी (जीएनएम) ऑक्झीलरी नर्सिंग, मिडवायफरी (एएनएम) हे अभ्यासक्रम चालवले जातात. एम. एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी दहा जागा असून त्यापैकी पाच जागा लहान मुलांचा (पेडियाट्रिक) व पाच जागा सामाजिक (कम्युनिटी) अभ्यासक्रमासाठी आहेत. एम. एस्सी हे पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर नर्सिंग शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक पदावर नोकरीची संधी उपलब्ध आहेत शिवाय संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी करता येते. या कोर्स साठी बी.एस्सी पदवीधारकांना प्रवेश प्रथम येणाऱ्यांना प्राधान्याने दिले जाते. बी.एस्सी नर्सिंग हा अभ्यासक्रम चार वर्षांचा असून त्यासाठी ऐंशी प्रवेशासाठी क्षमता आहे. या अभ्यासक्रमाला विज्ञान शाखेतील बारावी उत्तीर्ण झाल्याचे विद्यार्थी पात्र आहेत. या अभ्यासक्रमाला प्रवेश सीईटी - डीएमआर तर्फे दिली जाते. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आरोग्य संबंधित विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होता येते. जीएनएम हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून यात दरवर्षी साठ विद्यार्थ्यांना (मुले व मुली) प्रवेश दिले जाते. एएनएम अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून एकूण चाळीस मुलींना प्रवेश घेता येते. या दोन्ही अभ्यासक्रम ंना कोणत्याही शाखेतील बारावी व तत्सम वर्गातील विद्यार्थी पात्र ठरतात. जीएनएम व एएनएम हे डिप्लोमा कोर्स असून हे कोर्स पूर्ण केल्यानंतर सरकारी, निमसरकारी (महानगरपालिका व नगरपरिषद), सहकारी, खाजगी रुग्णालयात नर्सिंग ऑफीसर या पदावर काम करता येते. नर्सिंग क्षेत्रातील पदवीपूर्व (डिप्लोमा), पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर परदेशासह भारतातील नामांकित ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस / अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नवी दिल्ली (एम्स), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्स (निमान्स)/ राष्ट्रीय मानसिक स्वास्थ आणि स्नायू विज्ञान संस्था सारख्या केंद्र सरकारच्या रुग्णालयात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

विजयसिंह मोहिते पाटील नर्सिंग महाविद्यालयातून पदव्या घेऊन अनेक विद्यार्थी सध्या राज्यातील व देशातील विविध भागांमधील आरोग्य सेवेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. या महाविद्यालयात शिकवले जाणाऱ्या सर्व नर्सिंग अभ्यासक्रम ंतर्गतील प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक बाब म्हणून दरवर्षी पोषण आहार योजना उपक्रम राबविला जातो. या उपक्रमात रुग्णांना आवश्यक असलेले पोषण आहाराचे प्रकार तयार करून त्यातील पौष्टिकांश बद्दल माहिती दिली जाते. मधुमेही, अतिउच्च रक्तदाब, गरोदर महिला, माता महिला, लहान मुलांना, हृदयरोगी इत्यादी रुग्णांना अती वेगाने बरे होण्यासाठी पोषण आहार तयार करण्याची पद्धती अवलंबली जाते. या उपक्रमाला खास करून संस्थेचे अध्यक्षा सौ. शितलदेवी धैर्यशील मोहिते -पाटील स्वतः लक्ष घालून मार्गदर्शन करतात.

शिवरत्न नॉलेज सिटीत व्यवस्थापन क्षेत्रात उच्च शिक्षण देण्याची कटिबद्ध असलेले आणखीन एक महाविद्यालय म्हणजे शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज! या महाविद्यालयात बीबीए अभ्यासक्रमावर शिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून दरवर्षी या अभ्यासक्रमाला साठ विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाते. या अभ्यासक्रमातील बीबीए पदवी मिळवून विद्यार्थी नामवंत कंपनीत व्यवस्थापक पदावर काम करतात तर मोठ्या प्रमाणात स्वतःचे व्यवसाय सुरू करतात. या महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र असून त्या मार्फत एमबीए व एम. कॉम हे दूरशिक्षणावर आधारित अभ्यासक्रम चालवले जातात.

शिवरत्न नॉलेज सिटी संकुलात कार्यान्वित असलेलं उच्च शिक्षण देणारं महाविद्यालय म्हणजे ग्रीन फिंगर्स कॅलेज ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलाजी! सदर महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जात असून या महाविद्यालयाची व्यवस्थापन सुप्रसिद्ध श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टकडे आहे. सदर महाविद्यालयात बीसीएस (ईसीएस), बीबीए हे पदवी व एम. एस्सी (कंप्युटर सायन्स)

तथा एमसीए(दूरशिक्षण) अभ्यासक्रम चालविले जातात.

सुमारे साडेचार एकरात विस्तारलेले शिवरत्न नॉलेज सिटी निसर्गरम्य आहे. संकुलात वृक्षसंपदा विपुल आहे. बकुळ, आंबा, नारळ, फायकस, गुलमोहर, निलगिरी, चाफा, नीम, सप्तपर्णी, इत्यादी झाडं संकुलाला इकोफ्रेंडली केली आहे. विविध वृक्षसंपदेने नटलेल्या नॉलेज सिटी परिसरात नाना तऱ्हेचे पक्ष्यांचा कलरव सदाकाल ऐकायला मिळतो.या महाविद्यालयात वर्षभरात शिवरत्न शिक्षण संस्थेचचे कार्याध्यक्ष व विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते -पाटील व श्री. शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्टचे कार्यकारी संचालक विधान परिषदेचे विद्यमान आमदार रणजितसिंह मोहिते -पाटील यांच्या कुशल मार्गदर्शाखाली उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उद्योग व व्यवसायांना चालना देण्यासाठी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आयोजित केले जातात.






# मन कया रे विजयी !

**दक्षिण अफ्रिकेमध्ये ८ जून २०२५ रोजी झालेली ९० किलोमीटरची कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धा सोलापुरातील डॉ. वाघचवरे भावंडानी वेळेत पूर्ण करून जागतिक रेकॉर्ड प्रस्थापित केले. याची नोंद वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डस या संस्थेत नोंद झाली आहे. डेंटिस्ट डॉ. सत्यजित यांनी मॅरेथॉनचा स्टार्ट ते फिनिश लाईनपर्यंतचा कथन केलेला प्रवास त्यांच्याच शब्दात...**





डॉ. सत्यजित वाघचवरे
सोलापूर
९४२३३२६३००



हाच तो ''क्षण'' ज्याच्यासाठी मी गेले दीड-दोन वर्ष सातत्याने कठोर परिश्रम घेत होतो. ९० किलोमीटर ''कॉम्रेड मॅरेथॉन''ची फिनिश लाईन क्रॉस करताना माझ्या आनंदाला पारावार उरला नव्हता. मी माझ्या मनावरती विजय मिळविला होता. The miracle is not that I finished. The miracle is that I had the courage to start !! ऑगस्ट २०२२ला डॉ. अभिजीतने म्हणजेच माझ्या भावाने जेव्हा दक्षिण आफ्रिकेत जगातील सर्वात फेमस व सर्वात अवघड समजली जाणारी ९० किलोमीटरची ''कॉम्रेड मॅरेथॉन'' पूर्ण केली तेव्हापासूनच मी ''कॉम्रेड मॅरेथॉनचं'' स्वप्न उराशी बाळगून होतो. माझ्यासारख्या नवख्या रनरसाठी हा प्रवास नक्कीच खडतर व चॅलेंजिग होता. मग अभिजीतने मला रनिंगचे बेसिक ट्रेनिंग दिले. त्यात पाच किलोमीटरपासून ४२ किलोमीटरची अहमदाबाद अदानी फुल मॅरेथॉन नोव्हेंबर २२ पर्यंतची त्याने माझी तयारी करून घेतली. ती माझी पहिली फुल मॅरेथॉन होती. त्यानंतर मात्र अभिजीतने अत्यंत अनुभवी असे ''कॉम्रेड मॅरेथॉन कोच'' सतीश गुजारन 'रन विथ सतीश' यांच्याकडे कोचिंग घेण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

गुजारन हे मुंबई स्थित कॉम्रेड मॅरेथॉन कोच आहेत ज्यांनी 'रन विथ सतीश'च्या माध्यमातून अनेकांचे कॉम्रेड मॅरेथॉनचे स्वप्न पूर्ण केले आहे. सरांच्या कोचींगमध्ये रनिंगबरोबरच इतर खूप साऱ्या चांगल्या गोष्टींचा समावेश असतो. उदाहरणार्थ स्ट्रेन्थ ट्रेनिंग, तुमचा रोजचा डाएट, क्रॉस ट्रेनिंग बद्दल माहिती, experinced Comrades finishersचे, वेबिनार आणि लाईफ बॅलन्सबद्दलपण सर बराचश्या चांगल्या टिप्स देतात. त्यांनी माझी फुल मॅरेथॉन पासून ते अल्ट्रा मॅरेथॉन पर्यंतची चांगली तयारी करून घेतली. सरांनी माझ्या ओव्हर ऑल रनिंगच्या सर्वच बाबीं मध्ये मग तो रनिंगचा फॉर्म असेल रनिंगचे पोस्टर असेल रनिंगचा पेस असेल यामध्ये चांगले ट्रान्सफॉर्मेशन घडून आणले. ट्रेनींगमधल्या शनिवार रविवारच्या बॅक टू बॅक लाँग रन्स देखील व्यवस्थित करून घेतल्या. सरांच्या पेसिंग स्ट्रॅटजीमुळेच कॉम्रेडसाठी लागणारे मी २०२४लाच कल्याण मॅरेथॉनमध्येच घेतले. ट्रेनिंग रनमधल्या सर्व अल्ट्रा मॅरेथॉन ईंजुरी न होता चांगल्या पूर्ण झाल्या होत्या. त्यामध्ये २०२५ मधील फेब्रुवारीची लोणावळ्याची ५० किलोमीटरची टाटा अल्ट्रा मॅरेथॉन, मार्चची गणपतीपुळ्याची ५६ किलोमीटर, एप्रिलमधील कासुल्ट्रा ६५ किलोमीटर व मेमधील नाशिकच्या सप्तशृंगी गडावर केलेली ५६ किलोमीटर ची अल्ट्रा मॅरेथॉन या सर्व अल्ट्रा मॅरेथॉनच्या ट्रेनिंगमध्ये डाएट आणि झोप हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. या व्यतिरिक्त सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तुमची ''सपोर्ट सिस्टीम'' तुमचे स्वतचे हार्ड ट्रेनिंग जितके महत्त्वाचे असते तितकाच महत्त्वाचा असतो तो तुम्हाला मिळालेला 'फॅमिली सपोर्ट'. Without them I wouldn't have made it ! होय! घरातून जेव्हा तुम्हाला अशा आव्हानात्मक गोष्टी करण्यास प्रोत्साहन, पाठबळ मिळते तेव्हा तुमचे मनोधैर्य वाढते, तुमची इच्छाशक्ती आणखी प्रबळ होते. तुमचा आत्मविश्वास वाढतो व तुम्हाला यशाची खात्री होऊ लागते.

यावर्षीची आमची विशेष बाब म्हणजे आम्ही तिघे भावंडे, म्हणजेच बहीण डॉ. स्मिता राहुल झांजुर्णे, डॉ. अभिजीत, मी आणि आमचे भाऊजी डॉ. राहुल झांजुर्णे (आमचे विशेष प्रेरणास्थान) असे एकाच घरातले चौघेजण या स्पर्धेत सहभागी झाले होतो. दक्षिण आफ्रिकेतील वातावरणाशी जुळून घेण्यासाठी तीन दिवस आधीच शहरात पोहोचलो. वातावरण छान होते .थंडी जरी असली तरी सहन होण्याईतपत होती. रेसच्या आदल्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी आम्ही Pietermaritzberg कॉम्रेड डाऊन मॅरेथॉनची यावर्षीची स्टार्ट लाईनच्या दिशेने निघालो. तेथे मात्र थंडी जास्त होती. रूममध्ये हिटर लावून ठेवावे लागले इतकी तरी ती बोचरी होती.

रेस डे, रविवार पहाटे अडीचला नाष्टा करून चार वाजता स्टार्ट लाईनकडे आमची बस निघाली. तिथला मात्र नजारा काही औरच होता वातावरणात अत्यंत सकारात्मक अशी ऊर्जा होती. प्रत्येक चौकाचौकातून, गल्लीबोळातून रनर्सचे ग्रुपच्या ग्रुप स्टार्ट लाईनकडे निघत होते. अनेक अनुभवी कॉम्रेड फिनिशर्स बऱ्याच वेळा असे म्हणतात की कॉम्रेड मॅरेथॉनच्या स्टार्ट लाईनला उभारण्यासाठी देखील खूप हिम्मत लागते. सर्वजण आपल्या नेमून दिलेल्या ग्रुपमध्ये जात होते. बरोबर सकाळी पहाटे सहा वाजता आमच्या रेसचा ''गन शॉट'' झाल्यावर The "Ultimate Human Race सुरु झाली. गर्दीमुळे सुरुवातीचे काही मीटर्स चालत चालत स्टार्ट लाईन गाठली. ती टच केली, देवाचे स्मरण केले छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष केला. अभिजीतने आणि मी एकमेकांना शेक हँड करुन आता थांबायचं तर ९० किलोमीटर पार करून फिनिश लाईनलाच! असा निर्धार पक्का केला. मुलाला दिलेलं प्रॉमिस पूर्ण करायचंय अशी खूणगाठ मनाशी बांधली. नंतर प्रचंड गर्दीतुन वाट काढत काढत रेसचा एक एक टप्पा पार करत गेलो. खूप सारे ओळखीचे भारतीय रनर्स एकमेकांना चिअरअप करून प्रत्येकाला मुव्ह ऑन असे म्हणत होते. "One step at a time" या फॉर्मुलाप्रमाणे सगळेजण पुढे पुढे जात होते. एक एक किलोमीटर पूर्ण करत होते. चढ आला की फास्ट चालायचे व उतार आला की पळायचे ही स्ट्रॅटजी बहुदा सर्व रनर्स वापरत होते. कारण तिथले चढच असे होते की एकदम पट्टीचे रनर्स म्हणजे खूप फास्ट पळणारे रनर्स देखील अशा हिल्सला रिसपेक्ट देत चालतच होते.

स्ट्रॅटजीच अशी होती की पहिला हाफ म्हणजे पहिले ४५ किलोमीटर तुम्ही तुमची एनर्जी कॉन्सर्व्ह करायची व तीच पुढच्या हाफला म्हणजे, राहिलेल्या ४५ किलोमीटरला व्यवस्थित रेस पूर्ण करता येईल अशी वापरायची. माझे ३० एक किलोमीटर झाले असतील तेव्हा एक दक्षिण आफ्रिकी रनर ज्याचा आणि माझा स्पीड बऱ्यापैकी सारखा होता मला म्हणाला, Come on India , Come on India. "You Indians always beat us in cricket , today here in South Africa it will be difficult for you ! come on ! Run .....Run......." थोडा चढ आल्यानंतर आम्ही चालत होतो मग त्याला मी म्हणालो, "Dear brother, I am here not to beat any of you. rather I am here to conquer these massive hills & my mind. I'm here to finish the race within 12 hours! I am here to full fill the promise which I have made to myself & to my family !" ४५ किलोमीटरच्या Drumond हाफ वेला घरची सगळी मंडळी आई, पप्पा, शुभांगी, राजश्री व आमची पोरं इंडियाचे टी शर्ट घालून चेअरींग करीत खजूर, केळं, पाणी, एनर्जी ड्रिंक इत्यादी खाण्याचे साहित्य घेऊन उभारली होती .पोरं जोर जोरात ओरडत होती. पप्पा, काका run.. run... run ....शुभांगी सोलापूरची केळी (लकी वन) देत म्हणाली फनिश लाईनला भेटू, लवकर या. तर आईचं आपलं नेहमीचच सावकाश पळ रे बाबा!

त्या दीड-दोन मिनिटांच्या भेटीतील संवादातून पुढच्या सहा तासांसाठी नवीन ऊर्जा मिळाली होती. शरीरात एक प्रकारची नवीन चेतना निर्माण झाली होती. मन प्रफुल्लित झाले रिचार्ज झालो म्हणायला हरकत नाही. त्याच उर्जेने एक एक किलोमीटर पार करीत फिनिश लाईनच्या जवळ मी पोहोचत होतो. पण जसे सत्तर किलोमीटर होत आले. तेव्हा मात्र, पाय गळून चालले होते. चढावरती पाय उचलत नव्हते उतार जरी आला तरी पाहिजे तेवढा स्पीड पकडता येत नव्हता. पायांना क्रॅम्पस येत होते पण त्याकडे दुर्लक्ष करूनच पुढे जात होतो. कम ऑन इंडिया, कम ऑन इंडिया म्हणणाऱ्या साऊथ आफ्रिकन नागरिकांना हात उंचावून धन्यवाद देखील देता येत नव्हते, कारण हातातही तेवढे बळ येत नव्हतं. मनात फक्त एकच विचार येत होता की आता आपल्याला फिनिश लाईन गाठायची आहे. शरीर थकत चालले होते मन खचत होते. येथेच खरी कसोटी होती. शरीर थकणार आहे हे माहीत होतं पण मनाला खचु द्यायचे नाही. सारखे सारखे मनाला समजावून सांगत होतो की ही रेस आपल्याला फिनिश करायची आहे. संपूर्ण ट्रेनिंगमध्ये सातत्य आणि डिसिप्लिन पाळलेले आहे. ट्रेनिंग चांगले झालेले आहे, "You have gone through the process " फिनिश लाईन जवळच आली आहे ती ''तुला'' क्रॉस करायची आहे, आता कुठे थांबायचे नाही. सर्वात अवघड म्हणजे आपल्या स्वतः च्याच मनाच्या ताबा मिळविणे. तोच कठीण प्रयत्न करीत फिनिश लाईन दृष्टीक्षेपात येत होती. एकदाची ''ती'' दिसली! ''ती '' म्हणजे ''फिनिश लाईनची कमान'' दिसली! भ्रमनिरास झाला ना, माझाही झाला होता! कारण या कमानीपासून खरी फिनिश लाईन अजून पाचशे मीटर पुढे होती. जे स्वप्न दोन-तीन वर्ष पाहिले होते ते स्वप्न आता पूर्ण होणार या भावनेनेच मी फिनिश लाईनच्या दिशेने सुसाट पळालो. पहाटे सहा वाजता धावायला सुरुवात केल्यानंतर बरोबर सायंकाळच्या पावणे सहा वाजता मी फिनिश लाईन क्रॉस करूनच थांबलो. मी जिंकलो. मी माझ्या मनावरती विजय मिळाविला होता. माझे स्वप्न साकार झाले.

**कष्टाने कमावलेले मानाचे मेडल**

कष्टाने कमावलेले मानाचे असे छोटेसे Vic Clapham मेडल घेऊनच इंटरनॅशनल टेंटकडे जिथे घरचे सगळे थांबले होते. स्मिताने रेस फारच लवकर फिनिश केली होती. तर अभिजीत फिनिश लाईन क्रॉस करून आल्यानंतर घरच्या सर्व लहान मुलांनी उड्या मारतच आम्हा तिघांचे स्वागत केले व जल्लोषात आनंदोत्सव साजरा केला. मलाही सेंचुरी पूर्ण झाल्यावर विराट कोहली कशी उडी मारतो तशी इच्छा झाली. ईथे मात्र थकलेल्या मनावरती शरीराने ताबा मिळवला होता. त्यामुळे इच्छा असून देखील तशी उडी मारता आली नाही. पण ऋषभ पंत सारखी कोलांट उडी तर मी नक्कीच मारेन, पण बसल्या ठिकाणीच! पाहूया पुढच्या वेळेस हे जमतंय का? खूप खूप धन्यवाद. आई, पप्पा ,माझ्या दोन्ही बहिणी डॉ परिक्षिता, डॉ स्मिता. डॉ अभिजीत, वहिनी डॉ.राजश्री माझे भाऊजी, डॉ. अजित, डॉ. राहुल व माझे कोच सतीश गुजारन सर, टीम डब्ल्यू प्लस फॅमिली, सर्व सोलापूरकर, टीम आणि माझी स्ट्राँग सपोर्ट सिस्टिम असलेली माझी बायको डॉ. शुभांगी.

शब्दांकन : अजितकुमार संगवे
मो. ९८८११३३१०३

# चातुर्मासाचे महत्त्व

**चातुर्मासाच्या काळात श्रीविष्णु क्षीरसागरात निद्रा घेत असतो, तसेच या काळात पडणाऱ्या पावसाच्या पाण्यासह मातीतून नैसर्गिक शक्ती नदीत मिसळत असल्याने या काळात तीर्थक्षेत्री नदीमध्ये स्नान केल्याने पापक्षालन होते. वातावरणात रज-तमाचा प्रभाव वाढल्याने उपवास, व्रतवैकल्ये केल्यास ती अधिक फलद्रूप होऊन सात्त्विकता वाढवतात. चातुर्मासाचे विविध दृष्टीकोनातून असलेले महत्त्व या लेखातून जाणून घेऊया.**

व्रतं सर्वार्थसाधनम् । अर्थ : व्रतांने सर्वकाही साध्य होते.



जिवंतिका पूजन



शिवामूठ



हरतालिका पूजन



नवरात्र पूजन

हिरालाल तिवारी
सनातन संस्था
९९७५५९२८५९

### १. श्रीविष्णूच्या उपासनेसाठी उत्तम काळ

आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी या चार मासांना 'चातुर्मास' म्हणतात. या चार मासांच्या काळामध्ये श्रीविष्णु शेषशय्येवर योगनिद्रा घेत असतो. ज्योतिषशास्त्रानुसार या दिवसांमध्ये सूर्य कर्क राशीत स्थित असतो. श्रीविष्णूच्या उपासनेसाठी हा काळ उत्तम मानला जातो. सर्व तीर्थस्थाने, देवस्थाने, दान आणि पुण्य चातुर्मास आल्यावर श्रीविष्णूच्या चरणी अर्पण होतात.

### २. श्रावण मासाचे महत्त्व

'भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या 'श्रीमद्भगवद्गीते'तील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, 'मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी 'मार्गशीर्ष' मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावणमासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतो,

द्वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः ।
श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः ।।
श्रवणर्क्षे पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः ।
यस्य श्रवणमात्रेण सिद्धिदः श्रावणोऽप्यतः ।।

अर्थ : १२ मासांतील 'श्रावण मास' मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला 'श्रावण मास' असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती 'श्रवण' या शब्दातून झाली आहे. 'श्रवण' शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी एक म्हणजे 'हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र', असा आहे आणि दुसरा अर्थ 'श्रवण म्हणजे ऐकणे.' श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

३. हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासांच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार असणे

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगांपैकी 'नक्षत्र' या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र 'चित्रा' नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव 'चैत्र' आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र 'श्रवण' नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव 'श्रावण' आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

### ४. 'श्रवण' नक्षत्राची वैशिष्ट्ये

शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः सत्पात्रभक्तिः
विजितारिपक्षः । चेज्जन्मकाले श्रवणा हि यस्य
प्रेमा पुराणश्रवणे प्रवीणः ।। - जातकाभरण

अर्थ : श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

५. श्रावण मासातील धर्माचरण म्हणजे ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्र यांचे मानवी जीवनावर किंवा चराचर सृष्टीवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होत असल्याचा पुरावा असणे

हिंदु संस्कृतीचे निमिति असणार्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म इत्यादी करण्याचे मार्गदर्शन केले आहे.

त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात. बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे 'ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच', याचाच हा पुरावा आहे.

तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्ध असणार्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या 'श्रवण' नक्षत्रामुळे आणि 'श्रावण' मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते.

### ६. तिर्थक्षेत्री नदीत स्नान केल्याने पापांचा नाश होणे

जो मनुष्य चातुर्मासात नदीत स्नान करतो, विशेषतः तीर्थस्थानावरील नदीत स्नान करतो, त्याच्या अनेक पापांचा नाश होतो; कारण पावसाचे पाणी ठिकठिकाणांहून मातीच्या माध्यमातून प्राकृतिक शक्तीला आपल्यासह वाहत आणत नदीच्या वाहत्या पाण्यासह समुद्राकडे घेऊन जाते. चातुर्मासात श्रीविष्णु जलावर शयन करतो; म्हणून जलामध्ये त्याचे तेज आणि शक्ती यांचा अंश असतो. त्यामुळे त्या तेजयुक्त जलात स्नान करणे सर्व तीर्थस्थानांपेक्षाही फलप्रद असते. चातुर्मासात एका बालदीत १ - २ बिल्वपत्रे टाकून 'ॐ नमः शिवाय ।' हा मंत्र चार-पाच वेळा जपून स्नान करणे विशेष लाभदायी असते. त्याने शरिराचा वायूदोष दूर होतो अन् आरोग्याचे रक्षण होते.

### ७. काळे आणि निळे वस्त्र परिधान करू नये

चातुर्मासात काळे आणि निळे वस्त्र परिधान करणे हानीकारक असते; कारण या दिवसांत वातावरण निर्मळ असल्याने सूर्याचे किरण तीव्र होतात आणि हे दोन्ही रंग सूर्याच्या किरणांमधील अन्य सर्व रंगांना समाविष्ट करून घेतात. वर्षाऋतूत सूर्याचे किरण अधिक तीव्र असल्याने शरिराला ते हानीकारक असतात आणि म्हणून हे दोन रंग वस्त्रांसाठी वर्जित ठरतात.

### ८. परनिंदा करू नये

या काळात पानावर भोजन, नामजप, मौन, ध्यान, दान-धर्म आणि उपवास विशेष लाभदायी असतात. चातुर्मासात परनिंदेचा विशेष रूपाने त्याग केला पाहिजे; कारण परनिंदा ऐकणाराही पापाचा धनी होतो. परनिंदा एक महापाप आहे आणि या दोषाचा पापी पुढल्या जन्मीही यशापासून वंचित राहतो.

### ९. चातुर्मासातील उपवासाचे महत्त्व

चातुर्मासात एकाच प्रकारच्या अन्नाचे भोजन करणारा मनुष्य निरोगी रहातो. केवळ एकवेळ भोजन घेणार्याला बारा यज्ञांचे फळ मिळते. जो केवळ पाणी पिऊन रहातो, त्याला प्रतिदिन अश्वमेघ यज्ञाचे फळ मिळते. जो केवळ दूध किंवा फळ खाऊन रहातो, त्याची सहस्रो पापे तात्काळ नष्ट होतात. जो पंधरा दिवसांतून एक दिवस उपवास करील, त्याच्या शरिरातील अनेक दोष नष्ट होतात आणि चौदा दिवसांमध्ये त्याच्या शरिरात भोजन केल्यानंतर जो रस निर्माण होतो, त्याचे शक्तीत रूपांतर होते; म्हणून एकादशीचा उपवास महत्त्वपूर्ण असतो. हे चार मास नामजप आणि तपस्या यांच्यासाठी अतीयोग्य आहेत

### १०. चातुर्मासातील व्रतवैकल्यांचे महत्त्व

पावसाळ्यात आपण आणि सूर्य यांच्यात ढगांचा एक पट्टा निर्माण झालेला असतो. त्यामुळे सूर्याचे किरण, म्हणजे तेजतत्त्व, तसेच आकाशतत्त्व एरव्हीइतके पृथ्वीवर पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे वातावरणात पृथ्वी आणि आप तत्त्वांचे प्राबल्य वाढलेले असते. त्यामुळे वातावरणातील विविध जंतू, रज-तम किंवा काळी शक्ती यांचे विघटन न झाल्यामुळे या वातावरणात साथीचे रोग पसरतात आणि आळस किंवा मरगळ जाणवते. व्रतवैकल्ये करणे, उपवास करणे, सात्त्विक आहार घेणे आणि नामजप करणे यांमुळे आपण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या रज-तमाचा प्रतिकार करण्यास सक्षम होतो; म्हणून चातुर्मासात व्रतवैकल्ये करतात.













# अन्नछत्राची स्थापना करून जनमेजयराजेंनी रचला इतिहास

***एक आदर्श धर्मादाय संस्था न्यास कसे असावे याचा मापदंड श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी घालून दिला आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या लिला कार्याने पावन झालेली अक्कलकोट तीर्थक्षेत्र भुमी धामिक पर्यटनामुळे संपूर्ण जगात नावारूपास आली आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये दररोज हजारो भाविकानां व उत्सव काळात लाखो भाविकाना मोफत महाप्रसाद अन्नदान सेवेचा पाया संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी रचला. तर गरीब आनाथ व्याधीग्रस्तानं घरपोच जेवण हा उपक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी चालु करून यावर कळस चढविण्याचे कार्य केले आहे. ज्ञानदेव रचिला पाया तुका झालासे कळस ही उक्तीची आठवण यामुळे होते. संस्थापक अध्यक्ष जनमेयजयराजे भोसले यांच्या कार्याबद्दल स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर छत्रपती शिवाजी महाराज चरित्राचे ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील राष्ट्रीय प्रबोधनकार किर्तनकार इंदोरीकर महाराज यांनी गौरवोद्गार काढले आहेत. यामुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ धार्मिक सामाजिक वैदयकीय पर्यावरण विषयक शैक्षणिक क्रीडाविषयक राष्ट्र जडणघडणीत जे उपक्रम राबवित आहे याची अक्कलकोटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी ऐत्यासिक नोंद होईल यात तिळमात्र शंका नाही . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी एक इतिहास रचला आहे. ध्येयप्राप्ती होण्यासाठी त्या कामाप्रती झोकून द्यावे लागते त्या कार्यासाठी वेडे व्हावे लागते आणि ध्येयवेडया माणसा कडूनच इतिहास घडविला जातो . असाच इतिहास रचला संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी.***

**जे का रंजले गांजले । तोसी म्हणे जो आपुले ।**

देव तेथेची जाणावा ! महाराष्ट्र ही संताची भुमी येथे अनेक साधु संत महात्मे होऊनी गेले . आज आपण संताच्या आचार विचार अनुकरणाने त्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न करत आहोत . असेच संताच्या अनेक विचारान आचारान भारलेले वेळप्रसंगी नाठाळाशी मारू काठी प्रसंगी एखाद्या च्या मदतीसाठी धाऊन जाणारे पाठीशी खंबीरणे उभे राहणारे जनमेजयराजे भोसले १९८८ साली अंत्यत प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपल्या घरदार कुटुंबाकडे दुर्लक्ष करीत ध्येय वेड्यासारखे झपाटल्यागत कष्ठ सोसले .स्वामी भक्ताना मोफत महाप्रसाद भोजन मिळावे या उद्देशाने अवघ्या तीन किलो तांदळावर अंत्यंत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर अन्नदान महाप्रसाद सेवा सुरु केली. त्यांचे ध्येय उदात्त अंत्यत कल्याणकारी होते अन. साक्षात श्री स्वामी समर्थच अन्नछत्र मंडळाच्या पाठीशी उभे राहिले ! स्वामी भक्तानां मोफत महाप्रसाद मिळावा हा उदात्त हेतु सफल झाला. आज श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोज हजारो भक्तानां उत्सव काळात लाखो भक्तानां सळाळी संध्याकाळी दोन्ही वेळेस मोफत महाप्रसाद दिला जातो. मोफत महाप्रसाद देण्याच्या कार्याचा प्रारंभ पाया रचण्याचे काम संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी केल. तर यावर कळस चढविला ते श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी जे कोणी एखाद्या व्याधीने रंजले आहेत गांजले आहेत अनाथ आहेत. उदरनिर्वाह करू शकत नाहीत अशांना मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आपलेस केल. त्यांना दया दाखविली. स्वामी भक्ताना देण्यात येणारा महाप्रसाद भोजन हेच भोजन रोज डब्यामध्ये अंत्यत गरीब गरजूंना अनाथांना घरपोच दिला जातो. तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये कोणी गरीब अनाथ उपाशी राहू नये याची दक्षता श्री स्वामी समर्थ मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी घेतली आहे. म्हूणून म्हणावेसे वाटते की जे का रंजले गांजले । तोसी म्हणे आपुले देव तेथेची जाणावा ! आपल्या घरी अचानक पाहुणे आले तर त्याची व्यवस्था करताना आपली . फारच तारांबळ होते स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोजच स्वामी भक्त येतात. या साऱ्यांची मोफत महाप्रसाद सेवेची सोय करणे म्हणजे हा स्वामी समर्थाचा चमत्कारच आहे . हजारो नव्हे तर उत्सव काळात लाखो स्वामी भक्तांना कुठल्याही प्रकारची कमतरता न भासवता हे अन्नदाना चा मोठा यज्ञ चालू आहे. याकरिता मोठी दानतही लाकते उदारताही लागते स्वामी भक्त उदार हातानी देतात. हे सर्व करून आणण्याची मानसिकता हवी. जगात अब्जोधिश लोक आहेत पण दानत साऱ्याकडेच आहे असे होत नाही. मोठी दानतही असावी लागते ही मोठी दानतही श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे यांच्या जवळ आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यास राष्ट्र उभारणीत जडण घडणीत मोठे योगदान देत आहे. युवा पिढी बलवान तर राष्ट्र बलवान होईल ही उक्ती प्रमाणे मंडळाने युवकासाठी बंदिस्त जिम उभारले खुले जिमही उभारले आहे एवढेच नव्हे तर सृदृढ राष्ट्र निर्मीतीसाठी युवक सुदृढ बनविण्यासाठी पुढाकार घेतला. तालुक्यतील कुस्तीगिराना खुराक देऊन सुदृढ केले या कुस्तीगिरामध्ये स्पर्धा घेतली. प्राविण्य मिळविलेल्या कुस्तीगिराना स्पर्धेमध्ये नैपुण्यासाठी प्रोत्साहन दिले. पोशख खुराक मध्ये सातत्य ठेवले. कुस्तीगिरासाठी विशेष लक्ष देऊन युवा पिढी याकडे आकर्षित होण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी निरंतर कायम ठेवले आहे. या कुस्तीगिरांचे पालकत्वच मंडळाने घेऊन महाराष्ट्रातील लोप पावत असलेला खरा मैदानी खेळ कुस्ती जिंवत ठेवण्याच कार्य अमोलराजे भोसले यांनी केल आहे.

सोलापूर जिल्हा श्रमीक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वतीने पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य स्कूल बॅग, वही, कंपास, साहित्य वाटप कार्यक्रम घेतला. समाजातील अनेक जटील प्रसंग अडचणी नागरी समस्या मांडणारे प्रसंगी राजकारणी व प्रशासन यांच्याशी कटुता घेणारे पत्रकार यांनां समाज ऋण म्हणून मदतीला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ धाऊन आले. कोविड काळात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने केलेल्या कार्याला तोडच नाही. मंडळाने कोविड काळात सर्व इमारती कोविड सेंटरला दिल्या. अंत्यत गरजुना मंडळाने शिजवलेले जेवणाचे अन्न व शिधा ही पुरविले . जीवनावश्यक वस्तूचे किट वाटपही या काळात अन्नछत्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.


**नंदकुमार जगदाळे**
अक्कलकोट प्रतिनिधी


## ठळक मुद्दे

- मंडळाच्या उभारणीत प्रारंभी एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रत्येक महिन्याला स्वामीसेवा म्हणून मोठे योगदान दिले हे योगदान फार मोलाचे आहे . या योगदानाची कायम आठवण रहावी व यातुन उतराई होण्यासाठी मंडळाने एसटी साठी वाहन तळ कर्मचाऱ्यांना विश्राम कक्ष स्थापन केले.
- लातूर किल्लारी भुकंपात सर्वप्रथम १ महिना भर टुकभर शिजवलेले अन्न भोजन पुरवठा केला.
- अक्कलकोट शहराच्या सोंदर्यात भर घालण्या साठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा सिंहाचा वाटा आहे. अनेक चौक व रस्त्यानां नामफलक सुशोभीरण केले आहे. राजे फत्तेसिंह चौक येथे भाविकांच्या स्वागतासाठी स्वागत कमान उभारली आहे यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे.
- राजे फत्तेसिंह क्रिंडागणावर वृक्षलागवड संरक्षक भिंतीवर पर्यावरण संरक्षणाचे संदेश व बसण्यासाठी आसन व्यवस्था केली.
- अक्कलकोटवासीय व भाविकासाठी रुग्णवाहिकेची सोय केली आहे.
- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने शहरात तालुक्यात आग लागल्यास अग्निशमन वाहन तात्काळ तेथे सेवे देते.
- स्वामीभक्ताना दर्शनासाठी तुळजापुरला जाता नाही आले तर अन्नछत्र मंडळात अंत्यत देखणे आई तुळजा भवानी मातेचे मंदिर उभे करून भाविकांची आई जगदंबेच्या दर्शनाची आस पूर्ण व्हावी या हेतूने मंदिर उभे केले आहे.
- छत्रपती शिवरायांचे गडकिल्ले शिव स्मारक अजरामर धातुशिल्प शिवचरित्र दालन वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी ची साक्ष देणारे बालोद्यान रोपवाटिका भव्य स्वागत कमान जगदंबेचे मंदिर आदिची निर्मीती करून इतिहास घडविला.



## कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांचे शिवचरित्र व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्याकडून कौतुक

ज्या समाजात पाठीवर कौतुकाची थाप मारणारे असतात तो समाज क्रांती करतो. स्वामी समर्थअन्नछत्र मंडळा कडून येथे जे यशस्वी विद्यार्थी गुणीजनांचा आदर्श व्यक्ती चा गौरव केला जातो कौतुकाची थाप मारली जाते हे फार मोठ प्रेरणादायी कार्य स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या कडून केल जात आहे साऱ्याच्या वर कौतुकाची थाप मारणारे अमोलराजे भोसले यांचे कार्य मोठे प्रेरणादायी असल्याचे गौरवोदगार प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी यावेळी काढले.

## प्रसिद्ध राष्ट्रीय समाज प्रबोधन किर्तनकार हभप इंदोरीकर महाराज यांच्याकडून भोसले कुटूबांचे कौतुक

स्वामी समर्थाच्या कृपेमुळे हे अन्नदान धर्मसंकीर्तन चालू आहे जगात फक्त अक्कलकोट मध्येच अन्नदान मोठ्या प्रमाणात चालू आहे भोसले परिवार जोपर्यंत स्वामीची सेवा करतील तोपर्यंत अक्कलकोट परिसराला कायच कमतरता भासणार नाही असे गौरवोद्गार राष्ट्रीय कीर्तनकार प्रबोधनकार हभप इंदोरीकर महाराज यांनी कीर्तनसेवा प्रसंगी काढले आहेत .





## बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले

स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर कुटुंबियांचे जनमेजयराजे भोसले यांचे यांच्याशी अंत्यत स्नेहाचे संबंध स्वर्गीय लता मंगेशकर यांनी जनमेजयराजे भोसले यानां हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे दिव्य स्मारक उभे करावे असे सुचविले. लता दिदीचा हा आदेश मानून जनमेजयराजे भोसले यांनी अन्नछत्र मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य गड किल्ले शिवस्मारक उभे केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे अजरामर धातु शिल्प शिव चरित्र प्रसंगाचे दालन उभे केले आहे. स्व लता दिदीनां जो शब्द दिला होता तो शब्द जनमेजयराजे भोसले यांनी पाळला. म्हणून जनमेजयराजे भोसले यांच्या बाबत ठामपणे म्हणावेसे वाटते की बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

